प्रकरण पहिले

# मराठी समीक्षेची पूर्वपीठिका

### प्रकरण पहिले

# मराठी समीक्षेची पूर्वपीठिका

मानवी इतिहासामध्ये काव्यकला सुरु झाली तेव्हा पासून काव्याच्या गुणासंबंधी उद्‌गार काढण्याची प्रवृत्ती कोणत्या ना कोणत्या स्वरुपामध्ये असलीच पाहिजे. काय बरे आणि काय वाईट याची चर्चा मानवी जीवनातील आचार विचारासंबंधी जशी अनादी कालापासून केली जाते. तशीच वाङ;मयासंबंधीसुद्‌धा केली जाते. कवीने काव्य लिहिल्यानंतर ज्ञात्यांच्या अपेक्षा करणे ही स्वाभाविक प्रवृत्ती आहे. कालिदासांसारख्या कविकुलगुरुला सुद्‌धा या अभिप्रायाचे महत्त्व केवढे वाटत होते. हे शकुंतलाच्या प्रस्तावनेतील पुढील श्लोकांवरुन स्पष्ट होईल.

आ परितोषाद, विदुषा न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम बलवदीप शिद्दितानामात्मन्य प्रत्ययंचेत ।। विद्वानांचा संतोष झाल्याशिवाय नाट्याचर्याच्या प्रयोग विषयक ज्ञानाला मोल चढणे शक्य नाही. विद्वांनांचा संतोष होईल की नाही. याविषयी त्यांच्या मनात सांशकता उत्पन्न झालेली आहे. यावरुन नाट्यकृतीच्या योग्यते विषयी गौरवाचे उद्‌गार काढावे. अथवा तिच्यातील दोषांची निर्भत्सना करावी. अशी प्रवृत्ती ज्यांना अभिरुप संज्ञा होती. अशा विद्वानांच्या ठिकाणी अत्यंत प्राचीन काळापासून असली पहिजे. असा तर्क अस्थानी होणार नाही. 'नाटक' हे रसिक व विद्वान लोकांना सादर केल्यानंतर त्यांनी आपली वृत्ती कलुषित होऊ न देता औदार्य धारण करावे व नाटकांतील मर्म जाणावे अशी नाटककाराची नेहमी अपेक्षा असते. मालविकाग्नी नाटकातील सूत्रधार म्हणतो.

पुरणामित्येव न साधु सर्व न चपिकाव्य नवमित्यवधन।

सन्त परीक्ष्यन्यतरद, अजन्ते मूढ परप्रत्यय ने बुद्धी या ठिकाणी परीक्ष्य असा स्पष्ट शब्द वापरलेला आहे. नाटकाचे परीक्षण करुन त्यातील चांगला भाग कोणता ते ठरवावे. प्राचीन काव्य हे अर्वाचीन काव्य, यातील चांगले कोणते ते ठरवावे. प्राचीन काव्य हे ठरविण्यासाठी रसिकांनी व ज्ञात्यांनी हंसक्षीर न्यायाचा अवलंब करावा असे वरील श्लोकाचे तात्पर्य आहे.

काव्य अथवा नाटक कवि स्वतःच्या मनोविनोदासाठी लिहित असला तरी रसिकांपुढे ते ठेवून त्याविषयी त्यांचा अभिप्राय कळावा. अशी कविची उत्कट इच्छा वाङ;मयाच्या सुरुवातीपासून असली पाहिजे हे यावरुन स्पष्ट होते. रसिकांनी मान डोलावली म्हणजे हर्षनिर्भर होणाऱ्या कवींना कटु बोलणाऱ्या दोषान्वेषी माणसाचेही भय वाटावे हेही स्वाभाविकच आहे.

वाङ्मय विषयक केवळं लोक गौरवोद्‌गारच करतात असे नाही. त्या वाङ;मयातील दोष काढून त्यावर प्रखर टीका करण्याचे कामही ते लोक करतात. चांगले काय वाईट काय? हे ठरविण्याची ज्यांची पात्रता आहे. अशा संतानी काव्याचे श्रवण करावे अशी कालिदासाची प्रार्थना आहे. सोन्याचा कस लागण्यासाठी अग्नी हे साधन असते. अग्नीमध्येच सोन्याचा खरेपणा किंवा हिणकसपणा कळूण येतो. त्याचप्रमाणे काव्याची परीक्षा विद्वानांकडूनच होणार हे ओळखूण कवींनी त्यांचा धावा करावा हे उचितच होय. उत्कृष्ठ सोने अग्नीत तापविले असता काळे पडत नाही. त्याप्रमाणे विद्वानांनी केलेल्या परीक्षेमध्ये जे खरोखर थोर वाङ;मय असेल. ते निकृष्ट ठरत नाही. असे याचे तात्पर्य आहे. काव्याच्या उत्कृष्टतेविषयी व निकृष्टतेविषयी कोणत्या

तरी प्रकारच्या निर्णय देणे ही प्रवृत्ती जवळजवळ वाड;मयकलेच्या सुरुवातीपासून उद्भवली असली पाहिजे असे असले तर काहीही प्रमाद होण्याचा संभव नाही.

८ व्या शतकामध्ये श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वरांच्या मूर्तिखाली लिखित स्वरुपातील एक लेख आढळून आला आणि या लेखावरील अभिप्रायामध्ये काही मराठी अक्षरे आढळून आली. १० व्या शतकारंभाला मराठीमध्ये आद्यग्रंथ लिहिला. प्राचीन वाड;मयाची सुरुवात इथूनच झाली. १० वे शतक ते १८ वे शतक हा ८०० वर्षांचा कालखंड प्राचीन वाड;मय म्हणून ओळखले जाते. या कालखंडातील वाड;मयाचे स्वरुप संत, पंत, तंत होते. वाड;मयाची निर्मिती झाल्यानंतर हळूहळू समीक्षा डोके वर काढू लागली. वाड;मयाचा जन्म मानवी प्रवृत्तीतून झाला आणि समीक्षेचा जन्म देखील मानवी प्रवृत्तीतूनच झाला. मानवी प्रवृत्तीचे हे गुणच आहेत. प्रथम वाड;मयाचा जन्म झाला आणि नंतर समीक्षेचा. वाड;मयाबरोबर समीक्षेचा विकास होत होता. जेवढे वाड;मय विपूल प्रमाणात तेवढी समीक्षा विपूल प्रमाणात आढळत होती. या समीक्षेचे पीक वाड;मयामध्ये का वाढत होते ? आणि या पिकाची निर्मिती तरी का होते ? तिचे स्वरुप कसे आहे, समीक्षेचा प्रवाह कसा वाहत गेला. ? समीक्षेची सामग्री कोणती असावी. या प्रश्नांची उत्तरे खालीलप्रमाणे मांडता येतील.

मराठी वाड;मयावर जी समीक्षा केली जाते. मराठी वाड;मय म्हटले की, नाटक, कथा, कादंबरी, कविता, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णने, नियतकालिके, अक्षर वाड;मय प्रवृत्ती(वाद) पाश्यात्य टीकेचा मराठी समीक्षेवर झालेला परिणाम या संपूर्ण लेखनावर केलेला समीक्षकांचा सखोल अभ्यास. त्यांच्या वाड;मयाबद्दलच्या समीक्षेचे स्वरुप मांडता येईल. परंतु त्या समीक्षेचे स्वरुप नेमके आहे तरी कसे ?

'समीक्षा' लेखनाचे अनेक प्रकार आढळून येतात. साहित्य शास्त्रावर 'समीक्षा' लेखन झाले. कलेची तात्विक चर्चा करणारे लेखन वाड;मयप्रकारांची चर्चा करणारे लेखन होऊ लागले. वाड;मयाचे ऐतिहासिक समालोचन करणारे लेखन झाले. स्फूट ग्रंथावरही प्राचीन काळी परीक्षणे होऊ लागली. समीक्षेचा आढावा घेण्यासाठी चार भाग पाडणे सोयीस्कर होईल.

१) प्राचीन मराठीतील साहित्यशास्त्रीय विचार प्रारंभते इ. स. १८००.

२) इंग्रजी प्रभावाचा काळ इ. स. १८०० ते इ. स. १८७४.

३) विष्णुशास्त्रीचा काळ इ. स. १८७४ ते इ. स. १९२०.

४) अर्वाचीन काळ इ. स. १९२० ते इ. स. १९६०.

'समीक्षा' म्हणजे 'टीकाशास्त्र' ही समीक्षा एवढी विस्तार पावली. या समीक्षेची पाळेमुळे विस्तारत गेली. आणि याला नियमबद्ध करणे गरजेचे वाटू लागले. म्हणूनच या समीक्षेला शास्त्राचे रुप प्राप्त झाले.

मराठी समीक्षेच्या पूर्वपीठिकेचा विचार करताना असे दिसून येईल की, संस्कृत टीकाकारापेक्षा प्राचीन टीकाकारांची दिसून येणारी भिन्न दृष्टी. पहिले मिमांसक तर दुसरे आत्मनिष्ठ रसास्वादक डॉ. केतकरांची संतकवीच्या समकालीन होऊन गेलेल्या टीकाकारांवरील यथार्थ टीका केली.

ज्ञानेश्वर भास्करभट्टापांसून ते होनाजीबाळा प्रभाकर शाहीरापर्यंत मराठी वाड;मयामध्ये जो रसिकांचा वर्ग निर्माण झाला. ज्ञानेश्वरकालीन रसिकवर्ग हा संस्कृत टीकाकारांच्या परंपरेतून निर्माण झाला होता. पण तत्कालिन वाड;मय निर्मितीचा हेतू ध्यानात घेऊन संकलनपद्धतीने गुणग्रहण करण्याचा टीकेच्या पद्धतीचा

अवलंब केला हेच त्यांचे पहिले वैशिष्ट्य. एक प्रकारे संतकालीन मराठीतील रसिकांची परंपरा ही संस्कृत पंडितकविंच्या टीकाकारांच्या पुढची पायरी आहे. अभिरुचीच्या विकासाचे मोजमाप करण्याचे एक साधन या दृष्टीनेच संतकवीकालीन टीकाकारांच्या रसज्ञ दृष्टीचा विचार टीकेला सांधणाऱ्या या मधल्या दुव्याचे कोणालाही महत्त्व वाटल्याशिवाय राहणार नाही. संताची मोठ्यांकडे पाहण्याची दृष्टी चर्तुविद्‌य पुरुषार्थाची अवहेलना करणारी नव्हती. संतानी भक्ती व शांत या रसांचा पुरस्कार केला. ही गोष्ट काही टीकाकार म्हणतात त्याप्रमाणे साहित्यशास्त्रदृष्टीने संकुचित न होता पूर्वीच्या रस अवस्थेत स्वृहणीय होती. दोन रसांची उलट भरच पडलेली आहे. इतर रसांचा अविष्कार त्यामुळे थांबला नाही. शृंगार, वीर इत्यादी रसांना संताच्या काव्यामुळे सामान्य जनतेतून आळा बसलेला नाही. जो तो एका विशेष अभिरुचीच्या पातळीवर उभा राहून वरील रसाचा आस्वाद घेत होताच ही गोष्ट जुन्या मराठी वाड;मयातील पोवाडे, लावणी, कहाणी लीलेत दिसून येईल. यादवकाळातही गीते, चौपदी, धुवा, भोवी, ब्रीदावळी इत्यादी कवनांचे प्रकार प्रचलित होते. आणि विशिष्ट पातळीवरुनच लोकरंजनाचे कार्य लोकगीतकार करीतच होते. किंबहुना अभिरुचीच्या विचाराची पायरी म्हणून प्राधान्य पावलेले भक्ती व शांत हे दोन रस होत. शब्दच्छल करणाऱ्या पढिक टीकाकारांना अनुलक्षून ज्ञानेश्वरादी संतकवींनी जे उद्‌गार काढिले ते प्रसंगोपात्त पुढे येतीलच. १) तथापि सर्व उद्‌गाराचे मर्म ज्यात आढळते असा एकनाथांचा खालील नमुना.

नाना पदव्युत्पत्तिविदान। एकश्लोकी दशक्षा व्याख्यान
पोटी असता मानाभिमान। ब्रह्मज्ञान त्या कैचे
मी पंडित अतिज्ञान। ऐशिया नागवेल अहेता.
जेवी आंघळे नोवते नित्य। नित्य असता एकत्र
तैशी गती विद्‌वानांची। नित्य असती आत्मसखी
तोचि वाखाणती अहीभक्षी। परित्या स्वरुपासी नेणसी
मूखी गूळ उत्य घालिजे घाना। तो रस.

क्रियेला प्रतिक्रिया या न्यायाने गीर्वाण भाषेविरुद्‌ध जशी बंडखोर पणाची भाषा काही विद्‌वानांनी वापरली त्याप्रमाणे तत्कालिन रसिकवर्गानेही टीकेच्या पूर्वीच्या सांकेतिक नियमांस मूरड घालून मराठीमध्ये रसग्रहणाची व्यापकता सुरु केली.

वाड;मयीन प्रश्नांची मूलभूत चर्चा हे टीकेचे एक अंग होय. त्या चर्चेचे नियम ध्यानांत घेऊन वाड;मयाची परीक्षा करणाऱ्या टीकाकारांचा जो वर्ग संतकवीच्या वेळी अस्तीत्वात होता. त्यांना पंडिती वळणाचे कवी म्हणता येईल. याखेरीज टीकाकारांचा जो दुसरा वर्ग निर्माण झाला. तो अंतप्रेरणेने व स्वंयस्फूर्तीने संतकवीच्या काव्याच्या समंजसपणाने रसास्वाद घेणाऱ्या टीकाकारांचा होता. परतत्वाला स्पर्श करणे हाच प्रासादिक काव्याच्या सामंजसपणाने रसास्वाद घेणाऱ्या टीकाकारांचा होता. परतत्वाला स्पर्श करणे हाच प्रासादिक काव्याचा हेतू होय. ही संतकवीची भूमिका लक्षात घेऊन तत्कालिन रसिकांनी रसग्रहणांमध्ये अलंकारचिकित्सेपेक्षा रसास्वादावर अधिक भर दिला. हे दुसऱ्या वर्गातील टीकाकार पहिल्या वर्गातील टीकाकारांना पंडित म्हणून मान देऊ लागले. तुकाराम नेहमी म्हणायचे की, ब्रह्मज्ञालाही भक्ती रसाची गोडी चाखावयास लावीण. संतकवीच्यावेळी पूर्वोक्त प्रवाह सहजसुंदर मराठी भाषेत पुनः प्रवाहित झाला. नवे

वाङ;मय नवी टीका अशी एकंदर त्यावेळी मराठी वाङ;मयाची अवस्था झाली.

तत्कालिन अभिरुचि आणि वाङ;मयविकास यांचा परस्परसंबंध खालीलप्रमाणे दाखविता येईल. पढिक विद्वत्तेपेक्षा प्राकृतिक भावनाविष्काराला आलेले महत्व प्रेमळ भक्तीभावाला काव्याच्या अंतरंगामध्ये मिळालेले स्थान सात्विक, राजस, तामस असे भावनेचे प्रकार त्यापैकी सात्विक भावनेने उचंबळून येते. तेच श्रेष्ठ काव्य असा दृष्टीकोण परमेश्वरभक्तीने सात्विक भावना उचंबळून येते. म्हणून परमार्थिक विषयांवरील काव्य उच्च प्रकारचे आहे. अशी समजूत होती. भावनेला कारण होणारा विषय आणि त्यात प्रगट झालेले व्यक्तीमत्व यावरुन सिद्ध होणारा कवीचा मोठेपणा. रसिकांना अभिप्रेत असल्याने आदर्श कवी तोच आदर्श संत तोच कवी असा संप्रदाय त्यांच्यामध्ये निर्माण झाला. संतकवीला समाजामध्ये लोकसिद्धकांचे म्हणजेच आदर्श टीकाकारांचे स्थान मिळाले. कवीच्या व्यक्तीत्वाचा जीविताकडे पाहण्याचा त्यांचा विशिष्ट दृष्टीकोण दिसून आल्याखेरीज नुसत्या बाह्यगुणाला काव्यामध्ये महत्व नाही. ही व्यापक कल्पना मराठीतील ज्ञानेश्वरांदी संतकवींनी मांडली. मराठीतील संतकवीमध्ये मराठी कवीमध्ये मराठी कविता संस्कृत कवीतापेक्षा वेगळीच ठरण्याचे कारण म्हणजे तिच्यामध्ये उत्कटत्वाने प्रकट झालेला भक्तीरस हाच होय. अलंकाररहित काव्याची साधी सरळ रचना हेच मराठी संतकाव्याचे वैशिष्ट्य एकनाथांनी कवीची व्याख्या खालील शब्दांत केली आहे.

उपनिषदाचे मतितार्थ ज्याच्या मुखाचा वास पाहत  
परोघ परीघ ज्याचे निसत्या कवी विख्यात त्या नाव

यादवकालीन मराठी रसिकांची परंपरा ही संस्कृत साहित्यमीमांसकाच्या परंपरेमधून निर्माण झाली होती. डॉ. मा. गो. देशमुख यांनी 'मराठीचे साहित्यशास्त्र' या ग्रंथामध्ये तत्कालिन संतकवीची वाङ;मयीन सौंदर्याकडे पाहण्याची टीकादृष्टी कशा प्रकारची होती. याचा मार्मिक उहोपोह केलेला आहे.

डॉ. देशमुख यांनी पूर्वीच्या टीकाकारांनी कोणत्या पारिभाषिक संज्ञाचा वापर केला ते सांगितलेले आहे. संतकवींची दृष्टी केवळ काव्याकरिता काव्य अशी नव्हती. तर परमार्थाकरिता काव्य अशी ध्येयदृष्टी त्यांनी बाळगली. संस्कृत कवी व संतकवी या दोहोचेही स्फूर्तिस्थान म्हणजे व्यासवाल्मिकी यांचीच महाकाव्ये होती. संतकवीकालीन रसिकांची प्रेरणा संस्कृत टीकाकारांच्या प्रेरणेतच होती. संतकवीपासून निर्माण झालेला मराठीतील टीकाकारांचा स्वतंत्र वर्ग आणि हा बहुधा पद्याचाच विचार मांडणारा कविचा वर्ग अस्तित्वात होता. मराठीतील आरंभीचे टीकेचे व रसिकवर्गाचे तत्कालिन स्वरुप कसे होते हे शोधून काढणे आवश्यक आहे.

संत मंडळीमध्ये काही काव्यविषयक तत्वे नवीन होती. ती नविन तत्वे. रचनेत काव्यचर्चेतही दाखवित. संतकवींमध्ये टीकाकार होते. साहित्यशास्त्राच्या चर्चेत जसा कविचा तसाच रसिकाचा संबंध येतो. कविवरुन काव्याची त्याचप्रमाणे रसिकावरुन वाङ;मयाकडे पाहणाऱ्या टीकाकारांच्या अभिरुचीची परीक्षा होऊ शकते. या दृष्टिने प्राचीन मराठी वाङ;मयातील कवी व रसिक यांचे परस्परांकडे पाहण्याचे दृष्टीकोन लक्षात घेऊन त्यावरुन सामान्य जनतेच्या अभिरुचीच्या स्वरुपाचे निदान हे टीकेचे प्रमुख कार्य ठरते. श्री. य. खु. देशपांडे यांनी श्री. ऋद्धीपूरवर्णन या काव्याच्या प्रस्तावनेत 'संस्कृत' काव्याची परंपरा मंगलाचरणाच्या रुपाने महानुभाव पंथातील आद्य कवींनी मराठीत सुरु केली. अशा आशयाची टीका केलेली आहे. नरेंद्र, मुकूंदराज यांनी अभिमानास्पद उद्गार 'मराठी' भाषेबद्दल काढलेले आहेत.

प्राचीन मराठी वाड;मयामध्ये कवी आणि टीकाकार यांचा मेळ अगदी आरंभापासून पडलेला दिसतो. ज्ञानेश्वरीपासून ते महिपतीच्या संतचरित्रापर्यंत जे वाड;मय निर्माण झाले ते काव्य आणि जीवनावरील टीका यांची जपणूकही गोड मिलनच म्हणावे लागेल. प्राचीन मराठी कवीचे वाड;मय महाभारतातील रसग्रहणासारखे आहे. प्राचीन मराठी कवी एका दृष्टीने संस्कृत वाड;मयातील काही ग्रंथाचे टीकाकार असले तरी त्यांची दृष्टी आणि आजच्या टीकाकाराची दृष्टी यामध्ये बराच फरक आहे. 'भास्कर' कवीने आपला 'शिशुपाल वध' हा आपल ग्रंथ भावे यांस वाचून दाखविला तेव्हा गुरुने खालील टीका केली. 'भट्टो हा ग्रंथ निका झाला'. ज्या वाड;मय कृतीला परमार्थाचा स्पर्श झालेला नाही. ती वाड;मयकृती नीरस होय. या दृष्टीने विचारसरणीवरुन प्राचीन कवी व टीकाकार कोणत्या दृष्टीने वाड;मयाकडे पाहतात. हे दिसून येईल.

ज्ञानेश्वरांच्या भूमिकेवरुन वरील तत्वाचा उलगडा करणे आवश्यक आहे. ज्ञानेश्वरांना अभिजात कवित्वापेक्षा अभिजात रसिकता श्रेष्ठ वाटे. ज्ञानेश्वर म्हणतात.

वाचे बरवे कवित्व। कवित्वी रसिकत्व
रसिकत्व परतत्व । स्पर्शू जैसा।

मूळ ग्रंथातील सौंदर्याचे रहस्य जो टीकाकार सहृदयतेने व्यक्त करीतो. त्यांच्या टीका साहित्यात खेचराचि या मना सात्विकाचा पान्हा आणण्याचे सामर्थ्य असते. टीकाकार या नात्याने ज्ञानेश्वरांनी स्वत:कडे केवढी विनम्र भूमिका घेतली. याचा प्रत्यय १८ व्या अध्यायाच्या शेवटी त्यांनी काढलेली उद्‌गारावरुन दिसून येतो. एकनाथांचे जीवितकार्य ध्यानी आणल्यास टीकाकाराचेहिं टीकाकार वाटतात. त्यांचे ग्रंथकर्तृत्व अमूल्य आहेच. तथापि ज्ञानेश्वरीचे संशोधन करुन त्यांनी जी रसज्ञ टीकाकाराची भूमिका उघड केली. ती केवळ अपूर्व होय. संशोधनाच्या अखेरीस काढलेले उद्‌गार त्यांच्या विनयशील व्यक्तीत्वाची साक्ष पटवून देतात. संतानी मराठी भाषेत जीवंतपणा ठेवून तिला नेहमी फुलविण्याचा प्रयत्न केला. रामदासांची काव्यविषयक मते म्हणजे काव्य हे रसाळ मृदू असावे.

संतकर्विची परंपरा म्हणजे रसिक टीकाकारांची परंपरा होय. परस्परांविषयी वाटणारा आदर त्यांनी प्रांजलपणे आपल्या ग्रंथातून व्यक्त केलेला आहे. नामदेव, मुक्तेश्वर, रामदास, तुकाराम, श्रीधर, मोरोपंत महिपती यांनी आपणापूर्वी होऊन गेलेल्या कर्वीना प्रेमादरपूर्वक वंदन केलेले आहे. ज्ञानेश्वरांच्या बुद्‌धीचे गांभीर्य अगाद्य सिधूंसारखे आहे असे मुक्तेश्वर म्हणतात. तर मोरोपंत मयूरहि तारी म्हणून विनवितात. संतकाविनी राजाश्रय न घेता वाड;मय निर्माण केले. डॉ. केतकर, म्हणतात मराठी वाड;मयाकडे पाहिले तर मात्र हे वाड;मय राजाश्रयाशिवाय वाढत होते. व याचे कारण शिवाजीचे औदासिन्य हे नव्हते.

'भगवद्‌भक्ती' हा विषय सर्वकालीन आणि सार्वत्रिक आहे. असल्या टीकाऊ पायाचा आधार घेऊन काव्यरसाची कमाल एका जुन्या महाराष्ट्र वाड;मयारंभी मोरोपंतांनी केली अशी टीका कै. शि. म. परांजपे यांनी आर्यभारतेच्या प्रस्तावाने केली. संत परंपरेतील अखेरचे कवी मोरापंत हे होत. डॉ. केतकर म्हणतात, 'मोरोपंतांची इच्छा परीक्षादृष्टीची नव्हती तर केवळ काव्य करण्याची इच्छा होती.'

'शाहिरी' वाड;मय पेशवाईच्या कालखंडामध्ये विकास पावत होते. शाहिरकर्वीनी आपणापूर्वी होऊन गेलेल्या कवीविषयी आदर व्यक्त केलेला आहे. यं. नं. केळकर श्री. वर्दे त्यांनी 'मराठी शाहिर' या पुस्तकामध्ये रामजोशी आणि केळकर हे स्वतंत्र पुस्तक लिहिलेले आहे. वि. ल. भावे, न. चि. केळकर हे

टीकाकर वाचकांतील शिष्ट मानले गेलेल्या रसिकांचे प्रतिभिलीच होते. प्राचीन कवींवर आधुनिक काळांमध्ये शास्त्रोक्त टीका झालेल्या आहेत. टीकेचे स्वरुप वाड;मयाच्या प्रगतीला कितपत कारणीभूत होते. हे स्पष्ट होते. इंग्रजी आमलाच्या सुरुवातीला मुद्रणकलेप्रसाराबरोबर जुन्या कवींच्या काव्याचे संशोधन, मुद्रण आणि संपादन सुरु झाले. पावसकरांनी ज्ञानचंद्रोदयातून, मानव चंद्रोबा यांनी सर्वसंग्रहातून जा. बा. मोडक यांनी काव्य संग्रहातून 'परशुराम गोडबोले' यांनी नवनीतातून अनेक जुन्या कवींची काव्ये प्रसिद्ध केली. मोडक, ओक, चिपळूणकर, डॉ. भांडारकर, न्या. रानडे, वि. का. राजवाडे, वि. ल. भावे, ल. रा. पांगारकर, बा. भ. भिडे, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम, मोरोपंत, रामचंद्र विष्णू मांडगांवकर, अण्णा मोरेश्वर कुंटे, वि. ना. आठल्ये, कृ. ना. साखरे, वि. का. राजवाडे, बा. अ. भिडे, ग. कृ. आगाशे, न. चि. केळकर, फाटक श्री. ना. बनहट्टी, अळतेकर, म. भ. पोतदार, महानुभव संप्रदायातील टीकाकार मा. पोतदार, स. ह. ना. नेने भवाळकर, डॉ. वि. भि. कोलते, वा. ना. देशपांडे, डॉ. शं. गो. तुळपुळे, प्रा. व. दि. कुलकर्णी.

अभिरुचिप्रमाणे वाड;मयविकास होत असतो. मराठीतील संतांनी निर्माण केलेल्या वाड;मयासंबंधीचा उल्लेख करणे आवश्यक होईल. संतानी आपल्या धार्मिक वाड;मयाने सामान्य लोकांचे लक्ष प्रत्यक्ष जीवनकार्यापासून परावृत्त केले. आणि त्यांना एक प्रकारच्या भ्रामक तंद्रीत लोटले. असा एक आरोप प्राचीन संतकवीवर केला जातो. उदा. श्री. पाध्ये व श्री. टीकेकर हे लीहतात. एकंदरीत संताच्या उपदेशाचा उपयोग ऐहिक गांजणूक विसरण्यासाठी दिलेल्या अफूच्या गोळीप्रमाणे झालेला दिसतो. धर्म ही एक अफूची गोळी आहे. असे कार्ल मार्क्स आपणांस झालेल्या त्रासाचे मूळ जनतेने शोधून काढलेले नाही. मग त्याचे निराकरण करणे दूरच आपल्या कर्माची जबाबदारी अविचारपणे अदृश्य शक्तीवर टाकणे. अंगी शोशीक वृत्ती आणणे. नैराशाने जगणे इतकेच नव्हे तर पातशहाच्या चरणी लीन होणे असे परिणाम संत शिकवणुकीचा विपर्यास झाल्यामुळे झाले.

प्राचीन मराठी वाड;मयासंबंधी बोलावयाचे झाल्यास त्यातील ग्रंथ कोणत्या गुणांमुळे रसिकप्रिय होत गेले. हा विचार करणे इष्ट ठरेल. येथे एक गोष्ट उघड केलेली बरीच प्राचीन वाड;मय बहुतेक अध्यात्माच्या उत्कंठेने प्रेरित झालेले आहे. तथापि त्या ग्रंथाच्या रसिकांच्या हृदयातील स्थान अद्यापी अढळच होऊन राहिलेले आहे. याचे कारण जीवन विषयक दृष्टीकोण व लालित्य यांचा त्यामध्ये सुंदर संगम झालेला आहे असे म्हणावयास हरकत नाही. ज्ञानेश्वरांच्या अगोदरच्या महानुभावपंथातील भास्करभट्टाचा 'शिशुपालवध' हा मराठीतील पहिला ग्रंथ होय. या ग्रंथातील कित्येक ओव्यांतून जीव किंवा शीव किंवा आणि परमात्मा यांचे स्वरुप सांगताना कवीने तात्विक विवेचन केलेले आहे. रुक्मिणी व कृष्ण यांची शृंगारिक काव्ये काव्यात आलेली आहेत. काव्य चटकदार असले तरी ते परमार्थऐसे झाले नाही. मुक्तेश्वरांनी लिहिलेल्या महाभारताच्या पर्वांनी लोकांची मने वश करुन घेतली. तुकारामांच्या अभंगामध्ये मानवतेवरील प्रेमाने पुलकित झालेले त्यांचे भावपूर्ण अंत:करण प्रगट झालेले दिसते. प्रसादपूर्ण समंजस वाणीच्या सामर्थ्यावर श्रीधर अनेक कुटुंबाचा आवडता कवी झालेला आहे. वरील ग्रंथाचे एवढे महत्व वाढत जाण्याचे कारण म्हणजे विशिष्ट प्रसंगी जीवनाला समाधान देणारे आकर्षक शब्दसामर्थ्य यांच्या ठिकाणी वेळोवेळी प्रगट होत गेले.

प्राचीन टीकेपेक्षा अर्वाचीन टीकेचे रूप थोडे निराळे स्वरुपाचे होते.

प्राचीन मराठीतील साहित्यशास्त्रीय विचारात दोन टप्पे पडतात. १) संतकवींचा साहित्यशास्त्रीय विचार २) पंडित कवींचा साहित्यशास्त्रीय विचार. असे दोन कालखंड करुन समिक्षेचा विचार करणे सुलभ जाते.

संतकवींचे एक वैशिष्ट्य म्हणजे ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास या संतांनी स्वतंत्रपणे साहित्य शास्त्रीय लेखनावर काहीही लेखन केलेले नाही. मात्र त्यांनी वेद, वेदांत, माया, ईश्वर, भक्ती यांच्या अनुरोधाने काव्याचा विचार केलेला आहे. या काव्यविचाराचे स्वरूप काव्यगुण, काव्यकारण, काव्याचे प्रयोजन असे आहे. संत ज्ञानेश्वर काव्यबद्दल म्हणतात की,

"तैसे कथेचे इये ऐकणे। एक श्रवणासि होय पारणे।
आणि संसादु:ख मुळवणे। विकृतीविणे॥"

कानांचे पारणे फिटेल आणि संसारदु:खाचे समूळ उच्चाटन हे काव्य करु शकेल असे सूचित करताना काव्याचा हेतू मोक्ष मानला आहे. तेच अंतिम साध्य होय. एकनाथांनाही परमार्थसाध्य हाच काव्याचा हेतू मानलेला आहे. 'यश' हे भारतीय साहित्यशास्त्राने स्वीकारलेले प्रयोजनही त्यांनी नाकारले. त्यांच्या मते 'किर्ती' हा लोभ आहे तो काव्याचा अंतिम हेतू नाही. यशाचा आनंदही एकनाथांनी क्षुद्र मानला आहे. अंत:करणात सद्भाव, भक्ती निर्माण करण्याचे काम साहित्य करते. तुकारामाचा मोक्ष म्हणजे त्यांचा आवडता विठ्ठल.

" कणवेची वाणी। आता झुलका कारण।
आता हेच माप धरी। विठ्ठल हृदयात भरी॥ "

संत तुकाराम महाराज म्हणतात की, एकदा हृदय विठ्ठलाने भरले की बस. त्यापुढे शब्दांचे कामच संपले. 'शब्दांचिया संगे पिटु भक्तीचा डांगोरा' हीच तुकारामांची भूमिका आहे. रामदास तर म्हणतात.

' भक्तीविणा जे कवित्व। ते जाणावे ठोंबे वृत्त। '

संतानी केवळ काव्य प्रयोजनाचाच नव्हे तर काव्य कारणाचाही शोध घेण्याचा प्रयत्न केला. ज्ञानेश्वर आणि एकनाथ यांनी 'गुरुभक्ती' हेच काव्याचे कारण मानले. तुकारामांनी काव्यचि कारण विठ्ठल हेच मानले.

"आपुलियाबळे नाही मी बोलत।" असे म्हणून विठ्ठल हेच त्याचे कारण आहे असे म्हटले आहे. रामदासांनीही सरस्वतीकडे हे श्रेय दिलेले आहे. अशा रीतीने सर्वच संतानी काव्यनिर्मितीच्या कारणाचा विचार केला आहे.

काव्यगुणांच्या विषयी सुद्धा संतकवींनी विचार मांडले आहेत. ज्ञानेश्वरांनी शांत रस मानला. कवित्व, रसिकत्व, परतत्व आणि अलंकरिकत्व हे काव्याचे गुण सांगितले आहेत. तर काव्य शैलीबद्दल " जेथे साहित्य आणि शांति। हे रेखा दिसे बोलती। जैसी लावण्यगुण कुळवती। आणि पतिव्रता॥ "

एकनाथांनी काव्यगुणांविषयी चर्चा केली आहे. मात्र ती पारंपारिक पद्धतीची आहे. रामदासांनी काव्याचे काही प्रकार आणि काही गुण ही वर्णन केले आहे. कवीबद्दल सांगतान रामदास स्वामी म्हणतात. कवी म्हणजे कल्पतरु। कवीला कल्पकतेचा गुण असावा। काव्यामध्ये कल्पकता, रसपूर्णता, अलंकार, चरणबद्ध शब्द सोपेपणा, मृदूता, भव्यता अद्भूतता इत्यादि गुण असावेत. काव्यातील श्रेष्ठ कनिष्ठतेची चर्चाही त्यांनी केलेली आहे.

संतकवींनी काव्याचा गुण भक्ती हा रस मानला. पंडितकवींच्या साहित्यशास्त्राविषयी विचार करता असे दिसून येईल की, संत कवी प्रमाणे पंडितकवींनी साहित्यशास्त्रविषयी चर्चा केलेली नाही. पंडितकवीपैकी मोरोपंताची आर्या आजही वाचकांना, साहित्यप्रेमींना मोहित करते. पेशवाईच्या अखेरीस त्यांच्या काव्याचा चाहता असा एक रसिकवर्ग होता. वामनपंडितांच्या यमकांनी अलंकारिकतेचा हव्यास पुरविला तर श्रीधर, मुक्तेश्वर आदींनी शास्त्रशुद्ध अशा गुणवृत्तात्मक रचनेने मराठी वाचकांस चरित्रे आणि आख्याने यांची मेजवानी घातली. पंडितकवींची जशी स्तुती झाली. तशी टीकाही झाली.

डॉ. केतकरांच्या मते पंडितकवींनी स्वतंत्र काहीही सांगितले नाही. पंडितकवींनी काव्यमीमासा केली नाही. सर्वच पंडितकवी साहित्यशास्त्राच्या चर्चेविषयी उदासीन दिसतात. पंडितकवीकडे काव्यपरीक्षण करण्याची पद्धत नाही. त्यासाठी लागणारे मानसिक स्वातंत्र्य त्यांच्याकडे नव्हते. असे केतकरांना वाटते.

प्राचीन मराठी साहित्यातील पंडितकवीजवळ मराठी साहित्य शास्त्राला देण्यासारखे काही एक नव्हते. याविषयी प्रा. द. के. केळकर लिहितात. जे काही आहे ते तुटपुंजे साहित्यशास्त्र आहे. स्वतंत्र असे साहित्यशास्त्र संतांनी काही सांगितले नाही. त्यांनी भक्तीरसाला प्राधान्य दिले. पण भक्ती या रसाचे स्वतंत्र नव्याने उत्पादन केले नाही. त्यांच्यात शास्त्रचिकित्सा शक्ती नव्हती. असे नव्हे संस्कृत काव्य शास्त्रकारांच्या तोडीचे काव्यशास्त्र निर्माण केले. असे म्हणणे अतिशयोक्त आहे. जुन्या मराठीला स्वतंत्र साहित्यशास्त्र नव्हते. केळकरांचे हे विधान एकांगी वाटते. संतकवींच्यापैकी ज्ञानेश्वरांनी शांत ह्या नवव्या रसाचे केलेले प्रतिपादन स्वतंत्रच आहे.

पंताची आर्या म्हटले की, व्युत्पन्न महाराष्ट्रीयांनी गहिवरुन मान डोलविण्याचा एक काळ होता. त्यानंतर पंताच्या काव्यासंबंधी कृष्णशास्त्री आणि विष्णूशास्त्री चिपळूणकर या पंडित पिता पुत्रांमध्ये झालेला वाद प्रसिद्धच आहे. विद्वत्व, कवित्व आणि काव्यस्वाद यांच्यातील परस्परसंबंध जाणून घेताना आजच्या स्वरुपातील मराठी टीकापरंपराचा आणि टीका वाड;मयाचा पाया विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी घातला असे अनेक दृष्टीने म्हणता येते. त्यांच्यापूर्वीही टीकालेखन होते.

साहित्याच्या क्षेत्रांमध्ये पंडित्याने आणखी एका मार्गाने स्थान मिळविलेले होते. एक काल असा होता की, ज्यावेळी आणि विद्वान हे प्रायः समानार्थी शब्द होते. संस्कृतकाव्याच्या कालातील ही स्थिती मराठी काव्याच्या कालखंडामध्ये टीकलेली नव्हती. या कालामध्ये पारमार्थिकता आणि भक्ती यांचे महत्त्व विद्वत्तेहून अधिक मानले गेल्याचे दिसते याच कालामध्ये जे कवी पारमार्थिक विषयांवर व पारमार्थिक वृत्तीने लिहित नसत. हे कवी म्हणजे शाहीर होत. वैदग्धापित स्पर्शीत्वाला महत्त्व देऊन 'मराठी' कवितेत काव्यकल्पनेमध्ये क्रांतीच घडवून आणली. काव्याचा आणि पंडित्यांचा संबंध दुरावला.

पांडित्यांची आणि कवित्वाची ही फुटलेली जोडी इंग्रजी आंमलातील विद्यापीठ स्थापनेनंतर पुन्हा जुळली नाही. असे म्हटले तर चूक होणार नाही. इंग्रजी आंमलात इंग्रजी शिकलेल्या विद्वानांनी संस्कृत व मराठी काव्याच्या अभ्यासाला नवीन भूमिकेवरुन हात घातला. जुन्या मराठी काव्याचे अभ्यासक आणि अध्यापक म्हणजे कीर्तनकार व निरुपणकार हे होत. त्यांची काव्याविवरणाची पद्धत मार्मिक, रसाळ व भाविक असे त्यांच्यापुढे चिकित्सक विद्यार्थी नसत. तर भाविक श्रोते असत. त्यांच्या समोर छापील ग्रंथ नसे तर मुखोद्गत निवडक वेचे असत. अर्थात आवडीने मुखोद्गत केलेले ओव्यांचे व आर्यांचे सुरेल गायन

व त्यांची मनसोक्त प्रशंसा करणे हीच त्यांची काव्यस्वादाची काव्याध्यापनाची पद्धत असे. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर ही स्थिती बदलली. भगवद्भक्तीच्या हातातून निघून काव्य पुन्हा पंडितांच्या मुख्यत्वेकरुन विद्यापीठीय पंडितांच्या हाती सापडले. हे सर्वच पंडित काव्याचे भोक्ते असत. या पंडितांमध्ये अभिरुचीभेद अध्ययनभेद व पंथभेद असत. त्यातील काही काव्याचे द्वेष्टे असत. किर्तनकारांच्या तोंडून होणारे प्रेमळ काव्यगायन आणि या नविन पंडिताकडून होणारे गुण दोष दर्शन युक्त अध्यापन यांमध्ये अर्थातच फरक पडला. हा फरक भरुन काढल्यानंतरच की काय? स्वत:ची व आवडती काव्ये सुरेलपनाने सभिनय म्हणणारे काव्यगायन या काळांत पुढे आले. पण त्याहीपेक्षा महत्वाची गोष्ट म्हणजे काही कविच काव्यमिमांसक बनले.

प्राचीन काळी गद्य लेखन हे भक्तीच्या प्रसारासाठी लिहिले जात होते. उदा. ज्ञानेश्वरी, तुकारामांची गाथा, समर्थांचा दासबोध हे होत. बखरी कितीही सुंदर असल्या तरीही तिचा वाचकवर्गही बेताचाच होता. इंग्रजी कालखंडामध्ये मराठी गद्याच्या विकासाला सुरुवात झाली. गद्याचे रुपांतर काव्यामध्ये झाले. पुढील कादंबऱ्या सुरु झाल्या. यमुनापर्यटन, मुक्तामाला मराठीतील पहिले-पहिले कथावाड;मय धर्माचा विषय बनले.

अर्वाचीन वाड;मयाच्या समीक्षेला सुरुवात ही १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रीय समाजामध्ये सुखोपभोगाची प्रवृत्ती वाढली. सरंजामशाही वातावरणाची जागा इंग्रजांच्या नोकरशाहीने घेतली. मराठी शिपायांच्या तलवारी कायमच्याच स्नान झाल्याने त्यांना कामच राहिले नाही. पांढरपेशांना नोकऱ्या मिळू लागल्याने पोटाचा प्रश्नच उरला नाही. याचा परिणाम शाहिरी वाड;मयाच्या रुपाने पहावयास मिळतो. त्या काळी मनामध्ये भरलेल्या 'सुंदरी' च्या रंगमहालातून गुरुजनांना आणण्याचे काम विद्यार्थ्यांना करावे लागले. कथा कीर्तनातही या लावणीने प्रवेश केला. वेणीसुंदर, शाकुंतल यांसारख्या शृंगारिक नाटकांचे प्रयोगही याच काळामध्ये सुरु होऊन त्यासाठी वारेमाप खर्च होऊ लागला. सन १८४३त कानडी पद्धतीच्या यक्षगानाच्या रुपाने मराठीमध्ये 'सीतास्वयंवर' सारखी नाटके सुरु झाली. तर रासेलस, हतीमताई, यमुनापर्यटन आणि मुक्तामाला यांसारखे कथात्मक वाड;मय निर्माण होऊ लागले. या सर्व ललितवाड;मयाचा अभ्यास शास्त्री पंडिताकडून होऊ लागल्याने त्यांनी त्यांसाठी संस्कृत साहित्यशास्त्राचे निकष वापरले. या शास्त्री पंडितांच्या रुपाने मराठी टीकाकार-समीक्षकांचा उदय झाला.

या समीक्षकांत कृष्णाशास्त्री चिपळूणकर, रा. भि. गुंजीकर रिसबूड, लोकहितवादी, कुंटे, दादोबा पांडुरंग, माधवराव रानडे, यांची भर पडली. त्यांनी अभिप्रायवजा समीक्षा केली. तर दा. भि. प्रधानकृत, रसमाधव (१८६८) गणेशशास्त्री लेले, यांचे साहित्यशास्त्र (१८७२) ही साहित्य शास्त्रावरील पुस्तके निर्माण झाली. दादोबा पांडुरंगाचे यशोदा पांडुरंगी (१८६५) परशुराम तात्या गोडबोले यांचे केकादर्श (१८७२) हे काव्य परीक्षणात्मक ग्रंथही लिहले. तसेच का. बा. मराठे यांचे नावल व नाटक याविषयी निबंध (१८७२) हा एकुलता एक वाड;मयप्रकाराची चर्चा करणारा स्वतंत्र ग्रंथ निर्माण झाला.

इंग्रजी वाड;मयाच्या प्रभावाखालील कालखंडातील समीक्षेवरही इंग्रजी समीक्षेचा प्रभाव पडावा. हे स्वाभाविकच होय. या काळातील सर्व समीक्षक इंग्रजी वाड;मयाचे अभ्यासक होते. ह्या काळातील सर्व समीक्षा अभिप्राय वजा स्वरुपाची होती. 'कृष्णशास्त्री' काव्याचे स्वरुप स्पष्ट करताना म्हणतात. ग्रंथास

व्यापकता येण्यास तो छंदोबद्ध असलाच पाहिजे. असा नियम नाही. व जो छंदोबद्ध असतो. तो म्हणजे काव्यस्वरुपच असतो असाही नियम नाही. लोकहितवादी यांच्या मते, हेतुहीन पांडित्य व शृंगारिक वाड;मयाचा तत्कालिन मध्यम वर्गावर परिणाम झाला आहे. कुंटे यांनी क्लासिकल आणि रोमँटिक असे शैलीचे दोन प्रकार सांगितले. असे हे सर्व अभिप्रायात्मक लेखन असले तरी अर्वाचीन समीक्षेची काही बीजे याही कालखंडात रुजविली गेली आहेत.

या कालखंडातील समीक्षेचा विशेष असा की, तिने वाड;मय निर्मितीची मूल्ये आणि आस्वादमूल्ये यांची भेसळ केली. अण्णा किर्लोस्करांनी 'शांकर दिग्वीजय' या ऐतिहासिक नाटकांत 'पद्य' हे रसभंग करणारे ठरते. असा अभिप्राय दिलेला आहे. तर जयपाल नाटकाविषयी नाटककाराचे लक्ष भाव भावनांकडे असते. असा जो विचार मांडलेला आहे. त्यात आणि अर्थ सर्वांस समजावा म्हणून 'गद्य भाग' महत्वाचा मानणारा किर्लोस्करांचा विचार मांडलेला आहे. त्यात आणि अर्थ सर्वांस समजावा म्हणून गद्य भाग महत्वाचा मानणारा किर्लोस्करांचा विचार यांमध्ये अस्वादमूल्य रसिकांना समजावून देण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसतो. 'मंजुघोषा' कादंबरीचे लेखक रिसबूड- गोष्टीत अनुभवाचे मिश्रण असावे. असे जेव्हा म्हणतात तेव्हा ते निर्मितीमूल्यच मांडतात. त्यांच्या मते 'अनुभवमिश्रित गोष्टीत'ला अनुभव 'सामान्याहून' वेगळा म्हणजे अपूर्व असावा.

या वेळच्या समीक्षेचा आणखी एक विशेष असा की, वाड;मयकृतीच्या श्रेष्ठ-कनिष्ठतेचे निकष सांगणे. 'जानकी परिणय' नाटकाविषयी कृष्णशास्त्री म्हणतात. संविधानक रचनेपेक्षा रसनिर्मिती श्रेष्ठ असते. तसेच ते किर्तने यांच्या 'थोरले माधवराव पेशवे' या नाटकाचे त्यातील कारुण्यपूर्ण वास्तव चित्रणाबद्दल कौतुक करतात. माधवराव रानडे यांनी मनोरचनेतील बारकावे आणि युरोपियन कादंबरीतील निसर्गाचे हुबेहुब चित्रन यांचे कौतुक करुन इंग्रजी वाड;मयामध्ये रसास्वादाची मूल्ये आढळतात. ती आपल्या वाड;मयात आढळत नाहीत असे म्हणून मराठी वाड;मयाच्या श्रेष्ठत्वाचे निकष सांगून टाकले आहेत.

या कालखंडामध्ये समीक्षेत आलेले नीतिबोधाचे मूल्य हा एक समीक्षेचा निकष म्हणून सांगता येईल. गुंजीकर हे मूल्य, काव्य, नाटक आणि कादंबरीला लावतात. 'मनोरमा आणि विश्वासराव' या कलाकृतीवर त्यांनी नीतीची चाड न बाळगल्याबद्दल कडाडून हल्ला केला आहे. मात्र या नीतीची इष्टनिष्टता ठरविण्याचा विवेक या कालखंडात केलेला आढळतो. का. बा. मराठे यांनी 'नावलामध्ये हलक्या जातीचे मध्यम प्रकारचे लोक जितके जास्त घालावे. तितका वर्णनाला स्वाभाविकपणा येतो हे विलायती नावले लिहिणारांचे मत खरे आहे असे आम्हाला वाटत नाही.' असे म्हणून हा विवेक केलेला आहे. का. बा. मराठे यांनी नीतिमूल्याच्या ऐवजी तंत्रमूल्यांवर भर देऊन 'मराठी' समीक्षेत नवीन भर टाकली. मराठीतील कलावादी फडक्यांच्या तंत्रमूल्याचा उगम याच काळात झालेला दिसतो.

तुलनात्मक बुद्धीची जाणीव निर्माण होऊन या वेळच्या समीक्षेला आणखी एक वेगळे परिमाण लाभलेले दिसते. काही समीक्षकांनी तुकाराम, अनंतफंदी रामजोशी यांचा गौरव करुन 'यमक्या वामन' अशा स्वरुपामध्ये वामन पंडितास गौण लेखले असले तरी नविन आवडी-निवडीने जुन्या कवितेचे योग्य मूल्यमापन करता येत नाही. असे म्हणून दादोबा पांडुरंग व परशुराम तात्या गोडबोले यांनी त्याच पंडित काव्याची स्तुती केलेली आहे. मोरोपंतांची कविता दुर्बोध कोणाला? तर संस्कृत ज्याला येत नाही त्याला. मात्र अशी ही भूमिका घेणारे दादोबा नविन मूल्ये घेऊनच जुन्या काव्याचे मूल्यमापन करताना आढळतात. ते म्हणतात.

मोरोपंतानी परमेश्वराशी सलगी दाखविली ते अनुचित.

मिशनरी प्रवृत्तीतून दोषदीग्दर्शन करण्याची प्रथाही प्रथम याच कालखंडातील समीक्षेत आढळते. विल्सनने पंडित कवीच्यांवर विष्णुभक्ती, शिवभक्ती त्यांनी लाचारीने पत्करुन शब्दांचे चमत्कार साधण्यात आपली कविशक्ती फुकट खर्च केल्याचा आरोप केला अशा ह्या मिशनरी पद्धतीच्या समीक्षेचा प्रभाव चिपळूणकर, गुंजीकर, रानडे यांच्यावर पडलेला दिसतो. गुंजीकर म्हणतात, 'कवीच्या गुणदोषांचा विचार व्हावयास हवा. निर्मिती आणि आस्वादाच्या मूळ भूमिकेत अंतर पडत असेल तर कवि भूमिकेपेक्षा अस्वादकचीच भूमिका ग्राह्य मानने जास्त सांयुक्तिक ठरते.' गुंजीकरांनी कवीची भूमिका जशी नाकारली तशीच माधवराव रानडे यांनी यांच्यावरही पडलेला दिसतो. निर्मिती आणि आस्वादाच्या मूळ भूमिकेत अंतर पडत असेल तर कविभूमिकेपेक्षा आस्वादकाचीच भूमिका ग्राह्य मानने जास्त सांयुक्तिक ठरते. 'गुंजीकरांनी ही कवीची भूमीका जशी नाकारली तशीच माधवराव रानडे' यांनी त्यांनी केकावलीतील दोन दोष दाखविले.

भारतीय साहित्यशास्त्राचे जुने वळण टिकविण्याचा प्रयत्नही या वेळच्या समीक्षेत आढळतो. प्रधानांचे रसमाधव आणि लेले शास्त्रीचे साहित्यशास्त्र ही त्यांची उदाहरणे होत. मालापूर्व काळातील मराठी समीक्षा ही तुटपूंजी असली तरी तिने अर्वाचीन मराठी समीक्षेचा पाया घातला आहे. हे मात्र नाकारता येणार नाही. या कालखंडाच्या अखेरीस 'विविधा ज्ञान विस्तार' आणि निबंधमाला ही दोन नियतकालिके सुरु झाली. समीक्षेत मोलाची भर टाकली आहे. त्यांचा विस्तार या कालखंडाच्या पार्श्वभूमीवर करावयाचा आहे.

विविध ज्ञान विस्ताराचे कार्य :- इ. स. १८६७ ते इ. स. १९३७

इ. स. १८३२ सालापासून सुरु झालेल्या नियतकालिकांमुळे 'मराठी' गद्याचा प्रांत विकसित होत राहिला. स्वतंत्र स्वरुपाचे मराठी गद्यपद्य वाड;मयही याच दशकांनंतर सुरु झाले. निर्माण झालेल्या वाड;मयाविषयी अभिप्राय देण्याची आवश्यकता सामान्य वाचकांसाठी जरुरीची होती. मराठी वाचकांना वाचनाची गोडी लागावी म्हणून जसे दळबेशास्त्री कादंबरीलेखनास प्रवृत्त झाले तसेच ही वाचनाची गोडी विकसित व्हावी म्हणून निर्माण होणाऱ्या ललित वाड;मयाची समीक्षा व्हावी असे वाटणे स्वाभाविक होते.

ही काळाची गरज लक्षात घेऊनच सन १८६७ जुलैपासून 'विविध ज्ञानविस्तार' हे मासिक समीक्षेच्या क्षेत्राकडे वळले. १९ व्या शतकात सुरु झालेल्या नियतकालिकांत सर्वात अधिक काळ चाललेले हेच एकमेव मासिक होय. या मासिकाचे पहिले प्रकाशन रा. वि. मोघे हे असून संपादकपदी रा. भि. गुंजीकर विराजमान होते. गुंजीकर हे स्वत: शिक्षक मुख्याध्यापक आणि अ. डे. ए. इन्स्पेक्टर इत्यादी पदावर विराजमान झालेले एक सुविद्य आणि सुसंस्कृत पंडित होते. ते सनदी नोकर असले तरी त्यांची वाड;मयीन अभिरुची आणि बहुश्रूत प्रज्ञा त्यांना साहित्यक्षेत्रातही उदंड यश देऊन गेली. गुंजीकरांनी इ. स. १८६७ ते १८७४ या काळात विविध ज्ञानविस्ताराचे संपादन केले. या मासिकाच्या मुखपृष्ठावर 'कुलास्त्रिया' व 'गृहस्थ याकरितां ' असा मजकूर असून पहिल्या अंकाच्या संपादकीय उपोद्घातात याच्या परिणामानुसार यामध्ये नानाविध विषयांचा संग्रह केला जाईल. असे म्हटलेले आहे. शिवाय मासिकांतील विषयांची यादी देताना नवीन झालेल्या पुस्तकांचे गुण विवेचन असा वाड;मयीन समीक्षा या विषयाचा निर्देशही करण्यात आलेला आहे.

विविध ज्ञानविस्तारातून नानाविध विषयांचा संग्रह करण्याचे धोरण संपादकांनी ठेवले होते. तरी प्रामुख्याने ललितवाड;मय काव्य, कादंबरी विनोद नाटक आणि चरित्रपर लेखनच प्रसिद्ध होत राहिले.

त्याच्या जोडीला इतर विषयांवरील पुस्तकांचे अभिप्राय, वाङ;मयीन इतिहास वाङ;मय प्रकार आणि मराठी भाषेचा विचार याही स्वरुपाचे लेखन प्रसिद्ध होत राहिले होते. प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी 'युगवानी' च्या अंकातून याचे विस्तृत विवेचन केले आहे.

गुंजीकरांनी सुरु केलेले वाङ;मयकृतीच्या गुणावगुण विवेचनाचे सदर त्यांनी स्वतःच्या परीक्षणांनी फुलविले. त्याचा अनेक वाचकांवर चांगला परिणाम झाला इतरही अभ्यासक त्यांच्याप्रमाणे नव्या पुस्तकांचे विवेचन करु लागले. गुंजीकरांनी काव्य व काव्यकारण या विषयांवरही काही लेख लिहून मराठी भाषेच्या स्वरुपावर प्रकाश टाकला आहे. गुंजीकरांनी सुरु केलेले हे सदर शेवटपर्यंत या मासिकाच्या संपादकांनी चालविले. सन १८८५ सालच्या एका संपादकीयात म्हटले आहे की, 'पुस्तकपरीक्षेने जर प्रतिअंकात आम्ही जागा अडवावयास लागलो तर आमचे बरेच वाचक नाराज होतील अशी आम्हांस भीती वाटत आहे. पुस्तकपरीक्षेचे सदर पाहताच पुष्कळ वाचक ते टाकून पुढच्या सदराकडे जातात'. यावरुन असे स्पष्ट होते की, एक म्हणजे समीक्षालेखन विषयी वाचकांना औत्सुक्य नव्हते आणि दुसरे असे की, ही नाराजी पत्करुनही विविध ज्ञानविस्ताराने मोठ्या जिद्दीने ते सदर चालविले. या मासिकाने मराठी समीक्षेच्या इतिहासाचा पाया घालण्याचे काम केले. या मासिकाचे खरे कार्य १८७४ नंतरच सुरु झाले. त्याच्या जोडीला विष्णुशास्त्रींची निबंधमाला सुरु होऊन मराठीतील समीक्षेला गती मिळाली. पण मराठी समीक्षेच्या युगप्रवर्तनास प्रारंभ झाला तो मात्र विविध ज्ञान विस्तारामुळेच.

विविध ज्ञान विस्तारातील समीक्षेचे स्वरुप हे खालील प्रमाणे विषद करता येईल.

विविध ज्ञानविस्ताराने घालून दिलेल्या समीक्षेच्या पायाभरणीचे कार्य गुंजीकरांच्या समीक्षेने केले. त्यांच्या 'मोचनगड' कादंबरीच्या शुद्ध, रसाळ व प्रासादिक भाषेचा प्रभाव त्यांच्या समीक्षणात्मक लेखनामध्येही जाणवतो. त्यामुळे त्यांची परीक्षणे वाचकांना आवडली. मोरोपंतांच्या 'केकादर्श' या रचनेचे स्वरुप स्पष्ट करताना ते लिहितात. 'मोरोपंतांचा शब्द म्हणजे केवळ ब्रह्मवाक्य ही कल्पना सोडून देऊन त्यांच्या प्रतीच्या एकशेएकवीस श्लोकांमध्येच जो पूर्वापार असंगतपणा किंवा इतर दोष असतील तेही दाखविणे हा टीकाकारांचा धर्म आहे. यातून त्यांनी समीक्षा आणि समीक्षकाचे गुणविशेष कार्यच त्यांनी विशद केले आहे. कलाकृतीच्या गुणदोषांचे दिग्दर्शन म्हणजे समीक्षा ही समीक्षेची पद्धतच त्यांनी घालून दिली. 'अभिनव शाकुंतल' या ग्रंथावरही त्यांनी असाच मार्मिक अभिप्राय व्यक्त केलेला आहे. गुंजीकरांचे व्याकरणावरील निबंध आणि मराठी भाषेच्या घटनेची प्रस्तावना ही याच प्रकारात मोडते. याशिवाय त्यांनी 'लाघवी लीपी' 'महाराष्ट्र भाषेची लेखनशुद्धी' हे स्वतंत्र लेख व अनेक पुस्तकांतून अभिप्राय लिहिले आहेत. गुंजीकराप्रमाणे नंतर आलेले संपादक आणि अन्य समीक्षकांनीही हे कार्य पुढे चालविले. त्यामध्ये खालील स्वरुपाचे लेखन झालेले आहे.

'जनार्दन पंत मोडक' यांनी विविध ज्ञानविस्तारातून पोवाडे आणि लावण्यांचे संकलन करुन त्यावर काही लेख लिहिलेले आहेत. वामन दाजी ओक यांच्या 'संस्कृत कविपंचक' या विषयांवरील लेखही या मासिकातून प्रसिद्ध झाले. त्यांनी मूळ कृतीचा अभ्यास आणि मग त्यांच्या मराठी प्रकृतीची मूळ ग्रंथाशी तुलना अशा तौलनिक पद्धतीने परीक्षणे लिहिली आहेत. 'महाराष्ट्र ग्रंथोत्तेजन' हा ओक यांचा दुसरा ग्रंथही असाच प्रसिद्ध झाला. यात मोरोपंतांच्या काव्याचे तुलनात्मक विवेचन आहे. 'तुलना म्हणजे समीक्षा' ही

कल्पना ओकांनीच प्रथम रुढ केली. बा. अ. भिडे यांनी किरण, सुधारक, आधुनिक कवि पंचक, तुकारामचरित्र, विरहतरंग या पुस्तकांची परीक्षणे विविधज्ञान विस्तारातूनच प्रसिद्ध केली. त्यांची ही सर्व परीक्षणे श्रेष्ठ दर्जाची असून त्यांनी खंडन मंडनात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे. भिडे यांच्या आधुनिक मराठी काव्यावरील परीक्षनांनी मराठी समीक्षेला स्वतंत्रपणे विचार करण्यास शिकविले. भिडे यांच्या प्रमाणेच ना. गो. चाफेकर यांनी विविध ज्ञान विस्तारामधून काही वाङ;मय विवेचनात्मक लेख लिहिले आहेत. त्यांचे हे सर्व लेख 'साहित्यसमीक्षन' या त्यांच्या पुस्तकात पहावयास मिळतात. या पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये त्यांनी म्हटल्याप्रमाणे "ग्रंथकाराने प्रतिपादन केलेल्या सिद्धांताचा समतोलपणे विचार करणे हा टीकाकाराचा पहिला गुण मानावा लागेल." त्यांच्या स्वतंत्र टीकाबुद्धीची ही साक्ष सर्वच लेखनामध्ये पहावयास मिळते. त्यांनी मराठी समीक्षेला शास्त्रीय बैठक प्राप्त करुन दिली.

वि. मो. महाजनी यांनीही विविधज्ञानविस्तारातून अनेक परीक्षणे लिहली. त्यांनी लो. टिळकांच्या 'गीतारहस्या'वर टीका लिहून ग्रंथकर्त्यांचा यथोचित गौरव करणारी समीक्षा लिहली आहे. याप्रमाणे विविध ज्ञानविस्ताराने मराठी समीक्षेस स्वतंत्रता प्राप्त करुन दिली. परंतु या मासिकाच्या संपादकांनी वेळोवेळी जे जे विशेषांक काढलेले आहेत. त्यातून मराठी वाङ;मयाच्या प्रेरणा आणि प्रवृत्तीचांही विचार झाला आहे. अशा लेखानांमध्ये 'श्रीपाद कृष्ण कोल्हटकर' यांचे मराठी कथात्मक वाङ;मय. मराठी वाङ;मयाचे विशेष व त्यांचे उगम. गेल्या शंभर वर्षातील मराठी वाङ;मय व वाढ हे लेख रा. ब. महाजनी यांचा मराठी वाङ;मयाचे स्वरुप त्यांचा अभ्यास व वाढ वा. ना. देशपांडे यांचा गेल्या पंचवीस वर्षातील नाटके कमलाबाई किबे यांचा मराठी कादंबऱ्यांची दिशा (१९२३) नी. ब. भावळकर यांचा विविधाज्ञानविस्तार आणि मराठी नियतकालिके १९२६. ना. म. भिडे यांचा अर्वाचिन मराठी कवी व काव्ये. ना. के. बेहरे यांचा 'मराठी वाङ;मयातील चरित्रग्रंथ' आणि रा. ना. ब्रह्मनाळकर यांचे प्रचलित मराठी साहित्याची सामान्य चिकित्सा व कवि मोगरे आणि हे टिळक यांच्या कवितेतून व्यक्त होणारे अर्वाचीन मराठी काव्याचे सामान्य स्वरुप. प्रतिभावंत कवीची लक्षणे. ही सर्व वाङ;मय विवेचने आजही मराठी वाङ;मयेतिहासकारांना मार्गदर्शक ठरत आहेत.

मराठी नियतकालिकांमध्ये या कालखंडात विविधज्ञानविस्तारासारखे समीक्षेचे कार्य करणारे कोणतेही मासिक आढळत नाही. यावेळी 'निबंधमाला' जरी समीक्षा करु लागली होती. तरी ती अल्पायुषी ठरल्यामुळे मराठी भाषेला समीक्षेची जोड देऊन भाषाभिवृद्धीचे खरे कार्य याच मासिकाने केलेले आहे. आधुनिक समीक्षेचा आणि वाङ;मयाभिरुचीचा पाया घालण्याचे काम विविधज्ञानविस्तारानेच केले. मराठी साहित्यसमीक्षेत यामुळेच ह्या मासिकाला एक अनन्यसाधारण संदर्भग्रंथ म्हणून महत्त्व प्राप्त झालेले होते.

मराठीतील नियतकालिकांच्या उगमाबरोबर टीकालेखाला सुरुवात झाली. तत्कालीन टीकालेखन हे ग्रंथकारांना उत्तेजन मिळावे म्हणूनच लिहिले. मोरोपंताच्या केकावलीवर 'यशोदा पांडुरंगी' ही दादोबांची टीका (१८६५) मध्ये केकादर्शन आपल्या टीकालेखनाच्या प्रस्तावनेत मिमांसा केली. माधव चंद्रोबा यांनी १८६० मध्ये सर्व संग्रह मासिकाद्वारे मोरोपंत, वामनपंडित तुकाराम, रामदास, मुक्तेश्वर इत्यादीकांची काव्ये प्रसिद्ध केली. प्राचीन मराठी कवी हा तत्कालिन टीकाकारांच्या चर्चेचा आवडता विषय झाला. रा. भि. गुंजीकर प्राचीन संत कवींनी संस्कृत शब्दांत लेखनांमध्ये वापरले असले तरी ते वर्णनात कमी अधिक भरही टाकलेली आहे. 'वामन दाजी ओक'. अर्वाचीन टीकेबद्दल लिहिताना म्हणतात. अर्वाचीन टीकालेखन

म्हणजे १८०० च्या पुढील वाङ;मयीन आणि तत्कालीन टीकालेखन बा. ना. देव १८०० ते १८७४ हा अर्वाचीन कालखंडातील पहिला कालखंड आणि १८८० ते १९२० हा टीकालेखनाचा दुसरा कालखंड म्हणून ओळखला जातो. गो. ग. आगरकर, बा. गं. टिळक, शिवराम महादेव परांजपे, वि. का. राजवाडे, श्री. कृ. कोल्हटकर, चिंतामणराव वैद्य, लो. टिळक श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील टीकाकार हा युगप्रवर्तक असतो. कै. शिवराम महादेव परांजपे हे टीळकांचे समकालीन टीकाकार कोल्हटकर हे देखील अतिशय उच्च दर्जाचे टीकाकार आहेत. कै. न. चि. केळकर यांनी नाटक निबंध, चरित्र इतिहास इत्यादी वाङ;मयप्रकारावर टीका केलेली आहे.

अर्वाचीन टीकावाङ;मयावर इंग्रजी, संस्कृत वाङ;मयाचा परिणाम अंतरंगावर व बहिरंगावर झाला म्हणजे भाषेचा देखील परिणाम दुसऱ्या भाषेवर होत असावा. याचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल. अर्वाचीन टीकासाहित्याचे दोन ठळक भाग शास्त्रीय चर्चा व ग्रंथावरील कलात्मक टीका. प्राचीन मराठीतील मर्यादित वाङ;मयप्रकारांना आजच्या काळात मिळालेले बहुविद्‌य स्वरुप विषयदृष्ट्या व पद्‌धतीदृष्ट्या त्यामध्ये घडून येणारा विकास आजच्या काळात टीकेचा उत्पन्न झालेल्या भिन्न-भिन्न कसोटी रसप्रतीतीची मानसशास्त्रदृष्ट्या टीकाकारांनी केलेली छाननी. डॉ. पटवर्धन, डॉ. केळकर यांच्यातील मतविरोधी निष्कर्ष **sentiment** मध्ये स्थायीभाव निर्माण होणारा विषयविस्तार त्यावरील टीकेचा होणारा विस्तार सृष्टीप्रेम ही अविवेकाची भावना आहे काय ?

अर्वाचीन काळातील टीका या प्राचीन शास्त्रज्ञांच्या प्रणालीच्या आधारानेच निर्माण झाली. प्राचीन साहित्य शास्त्रातील पौर्वात्य व पाश्चात्य विचारांतील महत्वाचा भाग घेऊनच अर्वाचीन टीकाशास्त्राला इतकी प्रगती करुन घेता आलेली आहे हे विसरता यावयाचे नाही. अर्वाचीन साहित्यावर टीका ही होत असता तिची पद्‌धत कशा प्रकारची होती. तत्वे, नियम, प्राचीन टीकेपेक्षा कसे वेगळे होते. आधुनिक टीकाकार कोणकोणते होते. याचा आढावा घ्यायचा असेल तर आधुनिक टीकाकारांचाही अभ्यास करावा लागतो. आधुनिक टीकेचा अभ्यास करताना आधुनिक टीका शास्त्र की कला आहे. आधुनिक टीकेचा उद्‌देश म्हणजे तिची मदार काव्याची नाटकांची प्रतवारी लावण्यापेक्षा गुणदोष ठरविण्यापेक्षा त्यांच्या आकलनाकडे आणि आस्वादाकडे जास्त आहे हे उघड आहे.

वाङ;मयीन टीकेचे आजचे क्षेत्र केवळ वैयक्तिक आस्वाद आणि त्यांचे समर्थन एवढ्यावरच संपत नाही. प्राचीन काळी पांडित्यने वाङ;मय स्वादाच्या क्षेत्रामध्ये जे प्रमाद केले तितके हास्यास्पद नसले तरी त्याहून हानिकारक प्रमाद आजची विज्ञाननिष्ठा कधी कधी करते. काव्यात्म टीका करीत असताना त्या टीकेची नेमकी भूमिका कोणती असते. आणि त्या टीकेची समर्थनीयता टीकाकार कशा प्रकारे करतो. ज्याच्या अंगी काव्यानुकूलता व सहृदयता आहे त्याने केलेली काव्यमीमांसा ज्याच्याजवळ केवळ पांडित्य आहे त्याच्या काव्यमीमांसेपेक्षा केव्हाही अधिक मोलाचे ठरेल. हा त्या विवेचनाचा इत्यर्थ 'टीका' म्हणजे केवळ अस्वादन क्रीयाच असते. असे नव्हे काव्य स्वादाबरोबर टीकाकाराला विशेषत: आधुनिक टीकाकाराला विशिष्ट काव्याचे व त्याच्या जनकाचे वाङ;मयाच्या क्षेत्रालाही स्थान दाखवून द्‌यावे.

आधुनिक टीकावाङ;मयाचे वैशिष्ट्य आपण मागेच घेतलेले आहे हे वाङ;मय केवळ काव्यशास्त्रातील चर्चा करुन थांबत नाही. की काव्यावर मल्लीनाथी टीका लिहल्यानंतर समाधान मानीत नाही. काव्यशास्त्रावर

नव्हे तर विशिष्ठ काव्यग्रंथावर कवितासमूहावर व एकेका कवीवर स्वतंत्र विवरणात्मक आणि आस्वादात्मक विवरण लिहिणे हे आधुनिक टीकावाड;मयाचे विशेष आहे. अर्वाचीन वाड;मयामध्ये विशिष्ठ ग्रंथाच्या परीक्षणाने आणि काव्यस्वादाचे खास वेगळे दालन तयार झालेले आहे. या गोष्टीचे संपूर्ण स्वारस्य ध्यानात घेतल्याखेरीज 'Creative Crticism' अथवा काव्यात्म टीका प्रकारचे वैशिष्ट्य आणि महत्व लक्षात येणार नाही. एवढ्या करिताच शास्त्र, विनियोगात्मक अथवा Applied Criticism संबंधी येथे मुद्दाम थोडे विषयावर करावे लागते. ही विनियोगात्मक टीका म्हणजे केवळ नियमानुसार परीक्षण या रुपांमध्ये राहिलेली नाही. तिचे स्वरुप स्वतंत्र वाड;मयशाखेचे अत्यंत लोकप्रिय अशा वाड;मय शाखेचे झाले आहे. ही वाड;मय शाखा एवढी फोफावलेली आहे तिला एवढी मधूर फळे लागलेली आहेत की, तिच्या सुंदर फळाफुलांतच रमलेल्या तरुण वाचकाला पलीकडील महलातील कवितादेवीचे दर्शनही घेण्याचे भान राहू नये ही स्थिती टीकावाड;मयाच्या विस्ताराची आणि लोकप्रियतेची निदर्शक आहे. आधुनिक टीकेमध्ये काव्यात्म टीकेचे प्राचुर्य दिसून येईल. अर्वाचीन टीकावाड;मय हे केवळ विवरणात्मक वाड;मय राहिलेले नसून स्वतंत्रपणे आस्वादक असे 'ललित' वाड;मय बनलेले आहे. पण रवीन्द्रनाथांच्या प्राचीन साहित्यामध्ये समीक्षेच्या निमित्ताबाबत नवनिर्मिती झाली आहे. तिला मात्र काव्यात्म आहे हे विशेषण लागो. ती समीक्षाच आहे हे कोणालाही मान्य करावे लागेल. या लेखनामध्ये रवींद्रनाथांचा उद्देश नविन कथानक लिहिण्याचा व स्वभावचित्र घडविण्याचा नसून मूळ कवींनी मुख्य पात्रांच्या अगत्यामुळे जी पात्रे घाईघाईने तशीच मांडून दिली. त्याचा प्रेमळ परामर्श घेण्याचा आहे. येथे रवींद्रनाथांसारख्या प्रतिभावान समीक्षक वाल्मीकीने आणि बाणभट्टाने अर्धवट सोडलेल्या रेखाचित्रांमध्ये नाजूक कुचल्याने रंग भरीत आहे.

आधुनिक टीकेचे स्वरुपांमध्ये व उपयुक्ततेसंबंदूधी केवळ आपल्याकडेच नव्हे तर पाश्चात्य देशांमध्ये दिर्घकालीन वाद आहेत. तथापि आपल्या वाड;मयस्वरुपाबरोबरच आपल्या टीकाकल्पनेचे स्वरुपही अपरिहार्य आहे. आधुनिक टीकापद्धतीचा स्वीकार करणे म्हणजे एखादे नियमांचे पुस्तक पत्करणे नव्हे. आधुनिक टीका शास्त्रीय सिद्धान्तावर व नियमांवर भिस्त ठेवीत नाही. पण तेवढ्यावरुन केवळ वैयक्तिक अभिरुचीवर आजच्या टीकेचा निर्वाळा होतो. असे म्हणता येईल काय?

प्राचीनाभिमांनी अभ्यासकांपुढे अर्वाचीन टीकापद्धतीचाच अवलंब करतात. असे आढळून येईल. आज मराठीत मान्यता पावलेल्या काही कृतींचे आपण उदाहरण घेतल्यास हे सहज लक्षात येईल. चिपळूणकरांचे निबंध, हरिभाऊंच्या कादंबऱ्या, संशयकल्लोळ, मानापमान, सवाई माधवरावांचा मृत्यू, एकच प्याला, लग्नाची बेडी, तुज आहे तुज पाशी यांसारख्या कलाकृतींची वाड;मयीन परीक्षा करताना आपण जे प्रश्न उपस्थित करतो जे गुण व जे दोष दाखवून देतो. त्यांचा प्राचीन साहित्यशास्त्राशी संबंध बेताचाच असतो.

आधुनिक टीकेची शक्ती तिच्या सूक्ष्मतेत व नाजुकपणांमध्ये आहे ती निसंदिग्ध आहे. आधुनिक टीकेच्या विवेकात, सौंदर्य मीमांसा, कलास्वरुपमीमांसा व प्रतिभाचिकित्सा यांना प्रमुख स्थान नाही. आधुनिक टीकेत महत्व लेखकाची भूमिका लेखक कोठे उभा हे समजावून घेण्याला आहे. कारण त्यांचा आदर्श कळतो. १८८५ नंतरच्या मराठी वाड;मयातील विशेषत: काव्य, कथा, कादंबरी यातील सर्व उलटसुलट प्रवाह व त्यांच्या मधील प्रेरणा समजावून घ्यायच्या असतील त्यांचे यथार्थ मूल्यमापन करायचे असेल तर आधुनिक साहित्याच्या त्रिनेत्राचे खरे, खोल, गुंतागुंतीचे स्वरुप समजावून घ्यायला हवे. मराठी टीकेची काही

पहिली वर्षे वाङ;मयामध्ये सामाजिक प्रश्न शोधण्यात गेली.

ब्रिटिश आमंलापासून अर्वाचीन कालखंडाची सुरुवात झाली. असे मानण्यात कोणतीच अशास्त्रीयता नाही. ब्रिटिश कालखंडातील विठोबा अण्णा दप्तरदार, परशुराम तात्या गोडबोले यांच्यासारखे इंग्रजी टीकावाङ;मयाचा संस्कार नसलेले कवी तर परंपरेने जुनेच कवी होते. असे म्हटंले पाहिजे. कृष्णशास्त्री चिपळूणकर, हे ही जुन्या कवीत मोडतात. वामन मोरोपंतादिकांचे ध्येय. काही तरी तरावया गावे हेच असल्याने ते रामायण, महाभारत, भागवत या तीन प्रख्यात पुराणांतील कथांचे पुन:कथन करण्यात समाधान मानीत परशुराम तात्या व कृष्णशास्त्री यांना भवसागर ओलांडून जाण्याची तीतकीशी गर्दी नसल्याने ते संस्कृतातील परमार्थ शून्य नाट्यादिकांकडे वळत.

विविधज्ञान विस्तारानंतरच्या समीक्षेनंतर अर्वाचीन कालखंडातील दुसरे समीक्षक म्हणजे 'काशिराम बाळकृष्ण मराठे' (इ. स. १७४४ ते १३ नोव्हेंबर १९१८) श्री. मराठे यांनी 'चौतीस' पृष्ठांच्या या दोन निबंधामध्ये 'नावल आणि नाटक' या दोन वाङ;मय प्रकाराविषयी चर्चा केलेली आहे. इतिहास जर सामान्य माणसाच्या मनात पक्का रुजवावयाचा असेल तर त्यासाठी नावलाची आवश्यकता आहे. श्री. मराठे यांनी नाटकाचे विशेष कथन केलेले आहेत. नाटकामध्ये मोजक्याच गोष्टी असाव्यात. फार गोष्टी असल्यावर त्यांच्याकडे लक्ष देणे कठीण होते. नाटकाचा विशेष फार प्रौढ असावा त्याचप्रमाणे विषय देखील असा असावा की, त्यामुळे लोकांची सुधारणा झाली पहिजे, मनोरंजन उद्‌बोधन, अभिरुचीचे संवर्धन हीच प्रयोजने त्यांना अपेक्षित आहेत. त्यामुळे मनोरमा व स्वैरसकोशा या नाटकांवर त्यांनी प्रहार केलेले आहेत. श्री. मराठे यांनी या दोनही निबंधातून या दोनही वाङ;मय प्रकाराची सविस्तर चर्चा केलेली आहे. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील मराठी साहित्यसमीक्षेची वैशिष्ट्येच या निबंधातून साकार झालेली आहेत. या निबंधातून त्यांचे विद्‌वत्व त्यांची विश्लेषण पद्‌धती यांचा प्रत्यय येतो. मराठी वाङ;मयातील वाङ;मयप्रकाराची चर्चा करणारा पहिला निबंध हे त्याचे वैशिष्ट्यच मान्य व्हावे.

इंग्रजी कालखंडामध्ये पहिले समीक्षक म्हणजे 'विष्णूशास्त्री चिपळूणकर.' (जन्म २० मे १८५० व मृत्यू १४ मार्च १८८२) विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी टीकाग्रंथ लिहीलेले संस्कृत कविपंचक, भाषाविषयक मराठी भाषेची सांप्रतांची स्थीति, भाषादूषण, लेखनशुद्‌धी, भाषापद्‌धती भाषांतर व इंग्रजी भाषा. वाङ;मय विषयक चर्चात्मक. इतिहास वाचन, वक्तृत्व, विद्‌वत्व आणि कर्तव्य, ग्रंथावर टीका डॉ. जॉन्सन, मोरोपंताची कविता.

विष्णूशास्त्रींनी जे समीक्षालेखन केलेले आहे. त्यावर काही सिद्‌धान्तही मांडलेले आहेत. समीक्षेची त्यांची पद्‌धती त्यांच्या वाङ;मयाविषयक दृष्टीकोनावर प्रकाश टाकते. चिपळूणकरांनी मराठीला पाश्चात्य टीकापद्‌धती बहाल केली. हे कार्य चिपळूणकरांच्या इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाची साक्ष देते. संस्कृत कवि पंचकामध्ये कालिदास, भवभूती बाण, सुबंधु व दंडी यांच्यावर झाला पत्रकात लिहिलेले लेख एकत्रित करण्यात आलेले आहेत. या लेखातील पहिला सिद्‌धांत काव्यविषयक आहे. चिपळूणकरांच्या मते काव्य म्हणजे पद्‌य नव्हे रसभावसंपन्न रचना म्हणजे काव्य होय. ही भारतीय काव्यशास्त्राला अनुसरणारी आरत्या असली तरी त्यांनी ह्या संस्कृत कवीचा अभ्यास करताना भारतीय साहित्यशास्त्राच्या पद्‌धती ऐवजी पाश्चात्य समीक्षा पद्‌धतीतील ऐतिहासिक पद्‌धतीचा वापर केला.

विष्णू शास्त्र्यांनी पाश्चात्य समीक्षा पद्धती मराठी समीक्षेमध्ये रूढ केली. त्याचे कारण चिपळूणकरांच्या इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वामध्ये शोधावे लागेल. आपली खाजगी पत्रे व डायरी देखील ते इंग्रजीत लिहित. इतकेच नव्हे तर I am the shivaji of marathi हा मराठी विषयीचा अभिमानही त्यांनी इंग्रजी भाषेच्या माध्यमातून व्यक्त केलेला आहे हे लक्षात घेतले म्हणजे त्यांचे इंग्रजीवरील असामान्यत्व लक्षात येईल.

चिपळूणकरांनी प्राचीन कवींची ऐतिहासिक चिकित्सा केली. तत्कालिन परिस्थिती आणि कवी यांचा परस्पर संबंध शोधला. कालिदासाच्या काव्याचे परीक्षण करताना कालिदास राजाश्रित कवी होता. विष्णूशास्त्रीपूर्वी कवी व काळ यांच्या परस्पर संबंधाचा विचार करणारी समीक्षा मराठीत आढळत नाही. कवीचे चरित्र, कवीचे व्यक्तीमत्व आणि काव्य यांची परस्पर संगती लावून सौंदर्याचा शोध प्रथम चिपळूणकरांनीच घेतला.

ह्या पाश्चात्य पद्धतीप्रमाणे त्यांनी तुलनात्मक समीक्षा पद्धतीचा ही सुज्ञ वापर केला आहे. कालिदास व भवभूतीया भिन्न लेखकांचाही त्यांनी अभ्यास केला. चिपळूणकरांनी कालिदादसाच्या प्रतिभेचे चढ उतार दाखविलेले आहेत. ते म्हणतात भवभूतीमध्ये प्रत्येक नाटक निराहे रसाचे निर्माण करण्याची ताकद होती तशी ती कालिदासांमध्ये आढळत नाही. कालिदासाला याविषयी कमीपणा न देऊ देता कदाचित कालिदास दरबारी कवी असल्यामुळे असे झाले असावे अशी शंका निर्माण केली जाते. नविन समीक्षेचा पुरस्कार करुन 'मलीनाथी ' समीक्षा निरर्थक ठरविली आहे.

संस्कृत कवि पंचकातील रसभाव संपन्न रचना म्हणजे काव्य ही चिपळूणकरांची काव्याची व्याख्या म्हणजे त्यांच्या काव्यावरील एक सिद्धन्तच होय. काव्याचे काव्यत्व त्यातील भावनेच्या उद्दामपनात आहे. हा विष्णुशास्त्र्यांचा दुसरा महत्वाचा सिद्धान्त होय. प्रतिभेला सश्रद्ध परिश्रमशीलतेची जोड हवी. हा विष्णुशास्त्र्यांना अभिप्रेत असलेला आणखी एक सिद्धान्त होय. राष्ट्राच्या गरजेतून कवीचा उदय होतो. हा चिपळूणकरांना मान्य असलेला आणखी एक सिद्धान्त होय.

विष्णुशास्त्र्यांनी अनेक प्रकारची ग्रंथपरीक्षणे केलेली आहेत. 'ग्रंथावर टीका' हा लेख लिहून ग्रंथपरीक्षणाच्या पद्धतीचेही विवेचन केलेले आहे. त्यामध्ये 'आदर्श टीका' कशी करावी. याविषयी विचार मांडलेले आहेत. 'मोरोपंताची कविता' हा त्यांचा समीक्षा लेख प्रसिद्ध आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी मराठी भाषेचे व समीक्षेचे सामर्थ्य वाढवून मराठी वाचकांची सद्भिरुची संपन्न पिढीच निर्माण केली. चिपळूणकरांपासून स्फूर्ती घेऊन आगरकर, शि. म. परांजपे यांच्या सारखे जे साहित्यिक व समीक्षक निर्माण झाले यातच त्यांचा मोठेपणा सामावलेला आहे.

विष्णु शास्त्र्यांच्यानंतरचे समीक्षक म्हणजे गोपाळ गणेश आगरकर यांचा कालखंड (इ. स. १८५६-१८९५). आगरकरांचे टीकालेखन म्हणजे शेक्स्पीयर, अवभूती, कालिदास, कवी काव्य, काव्यरती, विकारविलसिताची प्रस्तावना या निबंधातून आपली साहित्यविषयक भूमिका मांडली. आगरकरांचे विचार हे स्वतंत्र होते. 'शेक्सपीयर' हा आगरकरांना कालिदास व भवभूतीपेक्षा श्रेष्ठ वाटतो. आगरकरांनी आपल्या कवि, काव्य, काव्यरती या निबंधात काव्याचे स्वरुप मांडलेले आहे. काव्य आणि शास्त्रीय ग्रंथ यांची तुलना केलेली आहे. मृदूता हा काव्याचा विशेष तर काठिण्य हा शास्त्रीय ग्रंथाचा विशेष मांडला.

आगरकरांनी सुखपर्यवासी काव्य व दु:खपर्यवासी काव्य अशी काव्याची व्याख्या केलेली आहे. 'कवी हा कामरुपधारी पटाईत बहुरुपी आहे' असे त्याचे यथार्थ वर्णन आगरकरांनी केले. आगरकरांची ही मीमांसा म्हणजे मराठी साहित्यविचाराचा सूर्योदय असे व. दि. कुलकर्णी यांना ते यथार्थ वाटते.

आगरकरानंतर समीक्षा केली ती 'शिवराम महादेव परांजपे'(इ. स. १८६४ ते इ. स. १९२९) त्यांनी लिहिलेली पुस्तके म्हणजे साहित्यसंग्रह भाग-१ वर विष्णुशास्त्री चिपळूणकरांपासून स्फूर्ती घेतली. शिवरामपंतांच्या अंत:करणातून संस्कृत भाषा व संस्कृत वाड;मयाविषयी प्रेम निर्माण झाले. शिवरायांच्या परंपराभिमानाचा प्रत्यय तर येतोच परंतु त्याच बरोबर त्यांच्या समतोल टीकापद्धतेची दर्शन घडते. ह्या भावनोत्कट समीक्षा लेखाचे सर्वश्रेष्ठ उदाहरण म्हणजे परांजप्याचे लेख म्हणजे भासाची भवितव्यता हा गाजलेला लेख. त्यांचे समीक्षालेखन नितांत रमणीय असे होते. विष्णुसहस्त्रनाम ह्या संशोधनात्मक लेखांतूनही शिवराम पंताच्या विद्वत्तप्रधान समीक्षेची साक्ष पटते. ते स्वतंत्र बुद्धीने निष्कर्ष काढून आपले वेगळेपण दाखवितात. साहित्यसमीक्षा एक शोध आहे असे वा. ल. कुलकर्णी म्हणतात. शिवरामपंताच्या सर्वच लेखनांत विनोद, उपहास व उपरोध हे गुण आढळतात.

शिवरामपंताची समीक्षा तत्कालिनांपेक्षा वेगळी कशी होती. हे सांगताना वा. मा. पाठक लिहितात. कै. शिवराम महादेव परांजपे हे टिळकांचे समकालीन टीकाकार होत. शिवरामपंताच्या टीकालेखांमध्ये विवेक आणि भावना यांचे समतोल प्रमाण दिसून येते. टीका आणि काव्य यांचे मधूर मीलन त्यांच्या निबंधातून आढळते. पुढील समीक्षक म्हणजे बाळकृष्ण अनंत भिडे (इ. स. १८७४-१९२९). विद्वत्त गंभीर समीक्षा हे भिडे यांच्या समीक्षेचे वैशिष्ट्य आहे. त्यांचे लेख म्हणजे किरण, आधुनिक कविपंचक.

भिडे यांची ही सर्व परीक्षणे त्यांच्या स्वतंत्र आणि मार्मिक विवेचक बुद्धीची साक्ष देतात. भिड्यांच्या नंतरचे समीक्षक म्हणजे ना. गो. चापेकर. चापेकरांचे टीकाग्रंथ म्हणजे साहित्य समीक्षण, चापेकरांचे निवडक भाग १ चापेकर यांनी विविध ज्ञानविस्तारातून अनेक ग्रंथांची परीक्षणे लिहली. 'साहित्यसमीक्षण' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत ते टीकाकारांकडे कसे गुण असावेत टीका कशी असावी. हे नमुद केलेले आहे. ग्रंथकार व ग्रंथावरील दोषांवर भर देण्यापेक्षा गुणग्राहकतेवर समीक्षकाचा भर असावा. डॉ. वा. मा. पाठकांच्या भाषेत बोलावयाचे झाले तर त्यांचे समीक्षणात्मक लेखन म्हणजे फणसाच्या सुरस गऱ्यांचाच लाभ देतात.

पुढचे समीक्षक म्हणजे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर. २९ जून १८७१ मृत्यू १ जून १९३४. त्यांचे टीकाग्रंथ म्हणजे सुदाम्याचे पोहे. १९३२ साली कोल्हटकरांचे २१ टीकालेख आलेले आहेत. कोल्हटकरांचा पहिला टीकालेख 'विविध ज्ञानविस्तारात' सन १८९३ साली प्रसिद्ध झाला. 'जीवनासाठी कला' या विचारसरणीचे ते पहिले साहित्य समीक्षक आहेत. 'विनोद' हे एक समाजाचे दोष दाखविणारे एक साधन मानले. कोल्हटकरांची समीक्षा ही घायाळ करणारी असते. असे केळकरांनी म्हटलेले आहे. हा शिकारी माणूस आहे. समीक्षेमध्ये तात्विक विवेचनावर त्यांनी जास्त भर दिला. वाचकांच्या विचाराला चालना देण्याचे श्रेय कोल्हटकर घेऊन जातात. मराठी टीकेच्या वैभवामध्ये बहुमोल भर टाकली. असे सौ. कुसुमावती बाई देशपांडे म्हणतात. कोल्हटकरांनी समीक्षेविषयी सिद्धान्तही बरेचसे मांडले. कोल्हटकरानंतर साहित्य सम्राट म्हणून ओळखले जाणारे समीक्षक म्हणजे न. चि. केळकर हे आहेत. त्यांचा जन्म २४ ऑगस्ट १८७२ आणि मृत्यू १४ ऑक्टोबर १९४७. त्यांचे टीकाग्रंथ वाड;मय म्हणजे काय ? काव्यदृष्टी का. म. जोशीनी

केळकरांचा गौरव भक्तीयोगी म्हणून केलेला आहे. त्यांच्या समीक्षेमध्ये निर्भिड विवेचन आहे. साहित्य विषयी अनेक सिद्धान्तही त्यांनी मांडले. वाड;मयाचा अंतिम हेतू कलाविलास होय. हा केळकरांचा दुसरा महत्वाचा सिद्धान्त आहे. हेतु संशोधनाचा गुप्त पोलिस वाड;मयापाठीमागे लावू नये. असे केळकर म्हणतात. शास्त्रीय सत्यापेक्षा व वाड;मयीन सत्य मोठे असे केळकर म्हणतात. प्रतिभेला सौंदर्याची जोड हवी असे केळकर म्हणतात. १८७० मध्ये जन्म झालेले पुढील समीक्षक म्हणजे वासुदेव बळवंत पटवर्धन. (इ. स. १८७० ते १९२१) त्यांचे टीकाग्रंथ काव्य आणि काव्योदय, तुकाराम महाराजांच्या अभंगाची चर्चा.

श्री. पटवर्धन यांनी भावना व विचार यांचा एकत्रित विचार केला नाही. ते दोन मनोव्यापारातील निराळेच घटक आहेत असे मानले. १८८० पासून मराठी कवितेत कोणकोणते बदल झाले याचे त्यांनी दिग्दर्शन केले. पटवर्धनांच्या नंतरचे ओळखले जाणारे समीक्षक वामन मल्हार जोशी (इ. स. १८८२ ते १९४३). त्यांनी लिहिलेले टीकाग्रंथ विचारसौंदर्य, विचारविलास, विचार विहार, विचार लहरी. वामन मल्हार केवळ एक समीक्षकच नव्हे तर साहित्यीक देखील होते. वामनरावांनी 'कलेसाठी कला' या मताचा पुरस्कार केला. वामनरावांनी केतकरांच्या कादंबऱ्यांवर टीका केलेली आहे. वामनरावांनी बोधपूर्वक व अबोधपूर्वक वाड;मय यांची चौकशी केली आहे. विनयवृत्तीचा प्रत्यय त्यांच्या टीकालेखातून जाणवतो.

'महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण' हा ग्रंथ लिहिलेले डॉ. केतकर हे डॉ. वामन मल्हार जोशी यांच्यानंतरचे समीक्षक यांचा टीकाग्रंथ व टीकासंग्रह म्हणजे 'महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण' या लेखसंग्रहामध्ये त्यांना महाराष्ट्रीयांच्या वाड;मयाभिरुचीचा इतिहास सांगावयाचा होता. प्राचीन संताविषयीचे विचार मांडलेले आहे. प्राचीन पंडितकविंना मानाचे स्थान दिले जात होते. परंतु हे चूक आहे कारण अलंकाराच्या आहारी हे पंडित लोक जात असत. अशा प्रकारचे विचार केतकरांनी मांडले.

डॉ. केतकरांनी काव्याभिरुची या शब्दा ऐवजी काव्यग्राहकता हा शब्द योजिलेला आहे. डॉ. केतकरांनी माझी भूमिका शिक्षकाची आहे असे म्हटलेलेले आहे. पुढचे समीक्षक म्हणजे नारायण सिताराम फडके ( ४ ऑगस्ट १८९४). टीकाग्रंथ प्रतिभासाधन वाड;मयविहार, साहित्य आणि संसार, कोदंणे, शेला पागोटे, झंकार प्रा. ना. सी. फडके यांनी साहित्याचा हेतू, साहित्यापासून मिळणारा आनंद इत्यादी सिद्धान्त मांडलेले आहेत. निर्विकल्प, श्रेष्ठ स्वरुपाचा आनंद देणे हा साहित्याचा हेतू आहे. श्री. फडके यांच्या समग्र वाड;मयाचा आढावा घेतला तर असे दिसून येईल की, त्यांना रसिक व मार्मिक या दोन्हीही पदव्या देता येतील. त्यांनी समतोलपणे गुणदोष दिग्दर्शन केलेले आहे. 'कलेसाठी कला' वा तत्वाचा 'फडके' यांनी पुरस्कार केला.

'कलेसाठी कला' हे तत्व अमान्य असणारे पुढील समीक्षक श्री. फडके यांच्या नंतर साहित्यीकाची समीक्षकाची भूमिका वठविणारे वि. स. खांडेकर हे आहेत. खांडेकरांचे टीकाग्रंथ व टीका संग्रह गडकरी : व्यक्ती आणि वाड;मय, वनभोजन गोकर्णीची फुले, फुले आणि काटे. खांडेकरांचा जन्म इ. स. १८१८ ला झाला. कलावंताने विचारवंत झाले पाहिजे असे ते मानतात. खांडेकर वास्तव वादाला अतिशय महत्त्व देत होते. त्यांच्या वास्तव जीवनाचे सोने, विचारवंताचा अग्नि व कलाकुसर, कलाकृतीची निर्माणशक्ती यातून कलाकृती निर्माण होते. वाड;मय हे प्रतिबिंब नव्हे चित्र आहे. असे ते आग्रहाने पुरस्कारतात. खांडेकरांच्या समीक्षाविषयक भूमिकेतून टीकाकार म्हणून त्यांची योग्यता सिद्ध झालेली आहे. 'जीवनासाठी कला' हे

तत्व स्वीकारुनच आपली टीका मांडली.

सौंदर्यवादी समीक्षक म्हणून ओळखले जाणारे २८ डिसेंबर १८९९ ला जन्म झालेले समीक्षक गजानन त्र्यंबक माडखोलकर. त्यांचे टीकाग्रंथ जीवनसाहित्य लेखसंग्रह, वाड;मय विलास, साहित्यशलाका, साहित्य समस्या विलापिका सत्य शोधने हे समीक्षकाचे कार्य असते. असे त्यांनी मानले. मांडखेलकर स्वतंत्र प्रतिभेचे 'समीक्षक' आहेत. आकाशवानीवरील भाषणांमध्ये ते म्हणतात. सृजनशील टीकाकार हा कवी आणि कादंबरीकार यांच्यापेक्षा एका परीने श्रेष्ठ म्हणावा लागतो. कलेकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन ध्येयवादी स्वरुपाचा आहे.

माडखोलकरानंतरचे समीक्षक आहेत. वा. ना. देशपांडे. यांचे समीक्षाग्रंथ म्हणजे रामशास्त्री, विचारसमीक्षा त्यांचे संशोधनपर ग्रंथ स्मृतिस्थळ, आद्य मराठी कवयित्री. देशपांडे हे संशोधक प्रवृत्तीचे लेखक होते. त्यांच्या लेखनांतून मार्मिक निरिक्षण आणि अनुभवजन्य चिंतनशीलताही दिसून येते.

रा. श्री. जोग हे वा. ना. देशपांड्यांच्या नंतरचे समीक्षक. त्यांचे साहित्यसमीक्षेवरील स्वतंत्र ग्रंथ अभिनव काव्यप्रकाश (१९३०). सौंदर्यशोध आणि आनंदबोध, काव्यविभ्रम, संस्कृत व काव्यवाड;मय स्फूट लेख चर्वणा (१९६०). विचक्षणा (१९३२) त्यांच्या समीक्षेचे स्वरुप मूलगामी, तात्विक स्वरुपाचे होते. सौंदर्यगोळा, आनंदबोधम, काव्यविभ्रम, मराठी वाड;मयाभिरुचीचे 'विहंगमावलोकन' हा जो यांचा एक महत्वाचा समीक्षा ग्रंथ आहे. वस्तुनिष्ठ समीक्षेला आत्मनिष्ठेची जोड दिलेली आहे. उत्कृष्ठ व्यासंग, खोल व्यापक, सूक्ष्म विचार, निर्भयपणा, शालीनवृत्ती, मार्मिक रसिकता, हे त्यांच्या साऱ्या वाड;मयनिर्मितीचे विशेष आहे.

'टीकाविवेक' हा अत्यंत गाजलेला समीक्षाग्रंथ लिहिणारे समीक्षक प्रा. श्री. के. क्षीरसागर. टीकाविवेकांमध्ये त्यांनी आधुनिक टीकेचे स्वरुप, आधुनिक साहित्याचे त्रिनेत्र असे स्थूल मानाने भाग पडतात. त्यांच्या या सर्व टीकात्मक लेखनापाठीमागे त्यांचे दीर्घकालीन चिंतन आणि अभ्यास हेच आहे. श्री. के. क्षीरसागरांच्या टीका लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे शीलाइलीलतेवर असो अथवा साहित्यातील एखादा ज्वलंत प्रश्न असो त्या त्या प्रश्नाचे अधिक संगतावर, मर्मग्राही आणि आपल्या भूमिकेत प्रामणिक राहून केलेले विवेचन.

संस्कृत व इंग्रजी साहित्याचा सखोलपणे अभ्यास करणारे साहित्यिक म्हणजे रां. शं. वाळिंबे. त्यांचे टीकात्मक ग्रंथ बालकवी, गडकऱ्यांचे अंतरंग, नाटककार गडकरी, ज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ती मराठीच्या साहित्यशास्त्रातील प्रश्न समजण्यास अधिकच सहाय्य होते.

वाळिंबेनंतरचे समीक्षक म्हणजे पुरुषोत्तम शिवराम रेगे. यांचा जन्म २ ऑगस्ट १९१०. यांचे टीकाग्रंथ छान्दसी या टीकाग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची भाषा विषयाचा सखोल अभ्यास आणि तर्कशुद्ध विवेचन या त्यांच्या विशेषांचा अवश्य उल्लेख करावयास हवा. प्रा. रेगे यांचे लयतत्वांशी मर्ढेकरांशी मतभेद आहेत. त्याचप्रमाणे दिलीप चित्रे यांच्या मताशीही ते सहमत नाहीत.

एक आगळे वेगळे समीक्षक म्हणून ओळखले जाणारे आणि साहित्यामध्ये 'क्रांतीकारक प्रयोग' करणारे बा. सी. मर्ढेकर हे मराठी साहित्यातील निराळे समीक्षक होते. त्यांनी केवळ तत्वेच सांगितली नाहीत तर तत्वांसाठी उदाहरणेही दिली आहेत. आत्मनिष्ठेबरोबर तादात्म्यता हा ही गुण अंगी असणे आवश्यक

आहे. असे मर्ढेकर सांगतात. मर्ढेकरांच्या विचारानेच 'मराठी समीक्षा' अधिक डोळस झाली.

मराठी समीक्षेमध्ये अनेक लेखकांनी समीक्षा केल्या. त्याचप्रकारे स्त्री समीक्षकांही होत्या. त्या म्हणजे स्त्री समीक्षां ओळखल्या जाणाऱ्या 'कुसुमावती देशपांडे'. यांचे टीकाग्रंथ म्हणजे पासंग, मराठी कादंबरीचे पहिले शतक भाग १ वर 'पासंग' या टीकालेखनातून त्यांनी अनेक कलाकृतींचे विवेचन केलेले आहे. मराठी कादंबरीचे पहिले शतक या त्यांच्या ग्रंथात त्यांनी मराठी कादंबरीच्या विकासाचा आलेख अत्यंत समतोलपणे चितारलेले आहे. त्यांचे हे सर्व लेखनच मौलिक आहे. इंग्रजी भाषेचे सखोल अध्ययन साक्षेपी अध्यायन, यांचा ठसा त्यांच्या टीकात्मक लेखनावर निश्चितपणे पडलेला आहे. डॉ. मा. गो. देशमुखांनी समतोलपणा संयमशीलता, सद्भिरुची, सहृदयता हे त्यांच्या कलेचे आणि समीक्षेचेही स्थायी भाव आहेत असे त्यांच्या लेखनाविषयी मत दिले. त्या मताशी कोण सहमत होणार नाही.

कुसुमावती देशपांडे यांच्या नंतरचे टीकाकार म्हणजे दि. के. बेडेकर (इ. स. १९१० ते १९७३). 'आदर्श साम्यवादी टीकाकार' म्हणून बेडेकरांना ओळखले जाते. त्यांचे टीकाग्रंथ साहित्यविचार हे गेलचे तत्वज्ञान. बेडेकर हे मार्क्सवादी होते. त्यांनी सौंदर्यवादाकडे दुर्लक्ष केले नाही. फुरसतीच्यावेळी ते विचित्रे तयार करीत.

बेडेकरानंतरचे समीक्षक आहेत. 'खडक आणि पाणी' हा अतिशय गाजलेला ग्रंथ लिहिणारे समीक्षक गंगाधर गाडगीळ. साहित्याचे मानदंड, खाडिलकरांची तीन नाटके इत्यादी ग्रंथ लिहिले. साहित्याच्या विवेचनामध्ये त्यांनी रसचर्चेची अडगळ मानलेली आहे. त्यांच्या दृष्टीने भावसत्य हे महत्वाचे आहे. पु. भा. भावे, वा. ल. कुलकर्णी यांच्या नवकथेवरील आक्षेपांनाही उत्तरे दिली. व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेची वैशिष्ट्येही नमूद केली आहेत. त्यांच्या वागण्यात सहजता आहे.

सर्व समीक्षकांमध्ये वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षकाचे स्थान हे थोड्या निराळ्या स्वरुपाचे आहे. ६ एप्रिल १९११ मध्ये कुलकर्णी यांचा जन्म झाला. यांचे टीकाग्रंथ म्हणजे वामन मल्हार, वाड;मयदर्शन, वाड;मयातील वादस्थळे, वाड;मयीन टीपा आणि टिप्पणी, साहित्य आणि समीक्षा, साहित्य शोध आणि बोध इत्यादी समीक्षा ग्रंथ लिहिले. मराठी नाटक आणि मराठी रंगभूमी. मराठी कविता १९२० ते १९५० काव्यातील दुर्बोधता काव्यसमीक्षा, व काव्यविषयक अनेक लेख लिहिले.

प्रा. वा. ल. कुलकर्णी यांचे टीकालेखन हे आज सर्वमान्य झालेले आहे. किंबहुना मराठीच्या प्रगत स्तरावरील अभ्यासास हे लेखन अत्यंत सहाय्यभूत ठरलेले आहे. प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी विविध स्वरुपाचे टीकात्मक लेखन केलेले आहे. वाड;मयातील वादस्थळे वाड;मयीन मते आणि मतभेद, वाड;मयीन टीपा आणि टिप्पनी, साहित्य शोध आणि बोध, साहित्य आणि समीक्षा या टीका लेखसंग्रहातून त्यांनी विविध विविध विषयांची उकल केलेली आहे. साहित्य आणि इतिहास, इतिहास आणि ललितलेखन गीत प्राचीन व अर्वाचीन इत्यादी वाड;मयीन प्रश्नांचा विचार करणारे लेखन जसे आहे तसे डोह, मुक्तामाला इत्यादी कलाकृतींच्या परीक्षणाचाही समावेश होतो. अत्यंत मौलिक पुस्तकांचे साक्षेपी संपादनही कुलकर्णी यांनी केले. आपल्या समग्र टीकालेखनातून त्यांनी कलेचे जग हे स्वायत्त, स्वयंपूर्ण आहे असे त्यांनी पुन:पुन्हा सांगितले. प्रा. नरहर कुरुंदकरांच्या मते वा. ल. हे मराठी समीक्षेतील मार्मिक रसिक अलोडनकार आहेत. ही समीक्षा करीत असताना ते सत्याला डावलीत नाहीत. मार्मिकता व अप्रतिहत रसिकता ही त्यांची

वैशिष्ट्ये आहेत. चिकित्सक दृष्टीने परीक्षण करणाऱ्या वा. ल. चा. क्रमांक बराच वरचा आहे.

वा. ल. कुलकर्णी म्हणतात कलेचे जग हे स्वायत्त हे स्वयंपूर्ण आहे. सत्यकथेच्या ऑगस्ट १९५३ च्या अंकात मराठी कथात्मक वाङ;मय आणि मनोविश्लेषणाचा त्यांनी शोध घेतला आहे. कुरुंदकरांच्या मते मार्मिकता आणि अप्रतिहत रसिकता ही त्यांच्या समीक्षेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

वा. ल. च्या नंतरचे समीक्षक म्हणजे डॉ. ग. बा. ग्रामोपाध्ये त्यांचे टीकाग्रंथ वाङ;मयविचार, 'मराठी अख्यान कविता एक अभ्यास ' या पुस्तकात डॉ. ग्रामोपाध्ये यांनी कै. स्मारक व्याख्यानमालेचा समावेश आहे. एकनाथ वामनपंडित, सामराज, विठ्ठल मोरोपंत यांच्या कामगिरीचे विश्लेषण डॉ. ग्रामोपाध्ये यांनी केलेले आहे. विठ्ठल आणि नागेश या कलेत या आख्यानकवितेला एक वेगळेच रुप दिलेले आहे. विठ्ठल कवींनी चमत्कृतीपूर्ण व बटबटीत रचना केली. तर नागेशाने विनोदाच्या हव्यासापायी गलिच्छ, द्विडीस गोष्टी या कवितेत अंतर्भूत केल्या. अध्यात्मिक प्रेरणा आणि अख्यानात्मकता यांचा बिघडलेला समतोल साधण्याचा प्रयत्न मोरोपंतांनी केला. असे त्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन डॉ. ग्रामोपाध्ये करतात.

२२ फेब्रुवारी १९०७ ला झालेले रा. अ. काळेले हे एक समीक्षक म्हणून ओळखले जातात. त्यांचे टीकाग्रंथ तांबे : एक अध्ययन, नवकवितेचे एक तप ताब्यांच्या काव्यात्मभूत मधूर संगीताचे रहस्य उकलून दाखविले आहे. तांबे हे केवळ प्रेमकवी नाहीत तर ते प्रेमगूढाचे उद्गाते आहेत. श्री. काळेले यांनी नवकवितेचे एक तप १९४५ ते ५७ हे आणखी एक टीकात्मक पुस्तक लिहिले आहे.

आपल्या प्रबंधाच्या शेवटी श्री. काळेले यांनी नवकवींची कामगिरी नमूद केलेली आहे. आपल्या नवकाव्यावरील या विवेचनात श्री. काळेले यांनी नवकाव्यावरील समीक्षकांच्या समीक्षेचा व त्यांचा अभिप्रायांचा उल्लेख केलेला आहे. शेवटच्या नवकाव्याच्या उगमापाशी या परिशिष्टामध्ये आजच्या नवकाव्याचे मूळस्तोत्र असणाऱ्या २० व्या शतकाच्या पूर्वार्धातील इंग्रजी कवींच्या काव्यवैशिष्ट्यांचा आणि त्यांच्या प्रयोगांचा धावता आढावा घेतलेला आहे.

'रणजित देसाई' यांच्या 'श्रीमान योगी' या कादंबरीवर प्रस्तावना लिहिणारे पुढील समीक्षक प्रा. नरहर कुरुंदकर यांनी 'रुपवेध धार आणि काठ' या ग्रंथातून आपले विचार मांडलेले आहेत. कुरुंदकरांच्या मते भावकोन, कृतिकोन, ज्ञानकोन, असे तीन कोन असतात. कलावंतामध्ये भावकोन प्रधान असतो. (तीव्र) मराठीतील एक समर्थ टीकाकार ही भूमिका श्री. कुरुंदकर यशस्वीपणे पार पाडीत आहेत.

कुरुंदकरानंतरचे समीक्षक म्हणजे 'शरच्चंद्र मुक्तिबोध' हे आहेत. त्यांचे टीकाग्रंथ म्हणजे 'नवी मळवाट' काही समीक्षात्मक लेख. प्रयोगवाद, प्रतिमाप्राधान्य, अमूर्तता व सौंदर्यवाद ही नवकाव्याची वैशिष्ट्ये मुक्तिबोधांना अभिप्रेत आहे. केशवसूतांच्या व्यक्तिमूल्याधिष्ठित मानवतावादाच्या काव्याप्रमाणे आपलेही समीष्टिमूल्यधिष्ठित मानवतावादाचे काव्य आशयनिष्ठ आहे असे मुक्तिबोधांचे म्हणणे आहे.

समीक्षा ही केवळ कथा, कादंबरी, नाटक, कथा यावरच झाली नाही तर अक्षर वाङ;मय, सांप्रदाय, साहित्य, नीती, प्रचार याविषयी अर्वाचीनांची टीका केली. साहित्यातील त्रिनेत्रावरही टीका केली गेली.

काव्यावरील टीकेविषयी विचार केला तर असे दिसून येईल की, गुढानुभवाचा आधार हे काव्यातील गूढगुंजनाचे एक वैगुन्यच ठरते. गोविंदाग्रजांच्या मुरलीतील किंवा फुटक्या तपेलीतील गूढगुंजन पोकळ आणि बदसूर वाटते. ते जुन्या वेदान्ताच्या सुलभ आधारानेच होय.

केशवसुतांची 'झपूर्झा' ही कविता या कवितेचे पहिले कडवेच काय ते खऱ्या अर्थाने गूढगुंजनपर आहे. फार तर त्याच धुंदीत त्या गूढ अनुभवाचे समर्थन करणारे दुसरे कडवेही गूढगुंजनपर म्हणता येईल. पहिलीत अन्तीद्रीय अनुभवाचे उर्स्फूत वर्णन आहे. तर दुसऱ्या विरोधाभासात्मक पण बेहोष भाषेत त्याच अनुभवाचे समर्थन आहे. पण कवितेची चार कडवी मात्र काही अंशी प्रतिपादात्मक नाहीत. हा टीकाकारांचा समज बरोबर नाही.

वाड;मयाच्या प्रत्येक कालखंडामध्ये समीक्षेची रुपे बदलत गेली. प्राचीन वाड;मयापेक्षा अर्वाचीन वाड;मयाच्या समीक्षेचे नियम वेगळे होते. प्राचीन व अर्वाचीन समीक्षेमध्ये फरक आढळून येतो. १० वे शतक ते १८ वे शतक हे संपूर्ण प्राचीन वाड;मय म्हणून ओळखले जाते. आणि १८ वे शतक १९६० पर्यंतचे म्हणजे अर्वाचीन वाड;मय होय. या कालखंडातील समीक्षा वेगळ्या प्रकारची आढळते. अत्तापर्यंत १० वे शतक हे १९२० पर्यंतचे वाड;मय आणि त्यावरील समीक्षेचा आढावा घेतल्यानंतर या दोहोपेक्षां १९६० नंतरचे वाड;मय कसे होते आणि त्या समीक्षेचे स्वरुप कशा प्रकारचे होते. हे खालील विवेचनावरुन लक्षात येईल. १९६० नंतरचे साहित्य व समीक्षा नाटक कादंबरी कथा, काव्य या सर्व वाड;मयप्रकाराची चिकित्सा आणि समीक्षा १९६० ते १९७० हे दशक रंगायनचे दशक ठरावे. प्रयोगिक रंगभूमी व नवे नाटक या शब्दाबरोबर रंगायनचे नाव ओघानेच येते. रंगायनने अनेक एकांकिका सादर केल्या. पाश्चात्य वाड;मय व रंगभूमीच्या परिचयाने एकांकिका हा नाटकप्रकार १९३० नंतर मराठी रंगभूमीवर आला असला तरी स्वातंत्र्योत्तर काळात १९५० नंतर नभोवाणी आकाशवाणीवरील श्रुतिका व एकांकिका हे दोन्ही प्रकार मराठी माणसांत खऱ्या अर्थाने रुजू लागले. स्वातंत्र्योत्तर नाट्यप्रवाहाच्या पार्श्वभूमीवर वैदर्भीय रंगभूमीचे अवलोकन करताना नाना जोग, पुरुषोत्तम दारव्हेकर, आणि महेश एलकुंचावर या तीन पिढ्यांतील तीन नाटककारांची मराठी रंगभूमीला नाट्याविष्काराची एक नवीन दिशा देणारे नाटककार म्हणून दखल घ्यावीच लागते. १९५० ते १९६० या दशकांमध्ये नाना जोग १९६० ते १९७० या दशकांत पुरुषोत्तम दारव्हेकर १९७० पासून थेट अत्तापर्यंत महेश एलकुंचावर यांनी वैदर्भीय रंगभूमीचे प्रतिनिधीत्व केले आहे. १९५५ ते १९६५ या वीस वर्षांच्या कालावधीमध्ये मराठी नाटक, सकस सामाजिक व राजकीय नाटक या काळांमध्ये निर्माण झाले नाही. दलित काव्य, आत्मचरित्र समृद्ध होत असतानाही रंगभूमी निर्माण झालेली नाही. अस्तीत्वाच्या तळाचा शोध घेऊन काही नवे गहन नाट्यवाड;मय निर्माण व्हावे ही इतर देशांमध्ये दिसणारी प्रक्रिया मराठी रंगभूमीवर क्वचितच दिसते. ज्या प्रमाणात तंत्र कारागिरीचा विकास झाला. त्या प्रमाणात नाट्यवाड;मयाची सकसता वाढली असे दिसत नाही. अशी खंत पुष्पा भावे यांनी प्रदक्षिणा भाग-२ स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा यामध्ये नोंदविलेला आहे.

१९७० ते १९८० या कालखंडामधील नाटकांविषयी काही समीक्षकांची मते १९७० च्या सुमारास रंगायनची घडी विस्कटली आणि अविष्कार पर्व सुरु झाले. रंगायनचा वारसा अविष्काराने पुढे चालविला 'छबिलदास' रंगमंचावर लर्का, टेनेसी यांसारखे कांही पाश्चात्य नाटककारांची नाटके झाली. परभाषिक नाटके या रंगमंचावर झाली. ५० च्या वर प्रयोग झाले. प्रायोगिक प्रथम प्रदर्शित झालेले नाटक म्हणजे 'विजय तेंडुलकर' यांचे 'घाशीराम कोतवाल' या नाटकाबद्दल अनेक समीक्षकांची अशी मते आहेत की, लोकमानस, लोककला आणि संकेत यांचे आशयाशी झालेल्या एकात्मीकरणातूनच मराठी प्रायोगिक रंगभूमीला

प्रेरणा तर मिळालीच पण दिग्दर्शन या विषयाला नवा ताजे पणा व सखोलता प्राप्त झाली. 'महानिर्वाण' हे आळेकरांचे नाटक ही या दशकांतील महत्वाचे नाटक म्हणून गौरविले जाते. या सर्व कालखंडातील नाटकांविषयी डॉ. रा. चि. ढेरे म्हणतात. मराठी रंगभूमीवरील एक अपूर्व घटित म्हणून डॉ. रा. चि. ढेरे यांनी या नाटकांचा गौरव केलेला आहे. गिधाडे (१९७०) अवध्य १९७१, सखाराम बाईंडर, घाशीराम कोतवाल १९७३ आणि वासनाकांड १९७४ ही नाटके रंगभूमीवर वादळग्रस्त ठरली. या नाटकाबाबत डॉ. वीणा देव म्हणतात. या नाटकांनी मराठी रंगमंचाला आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही संदर्भामध्ये वेगवेगळ्या मिती दिल्या. १९६९-७० पासून १९७६-७७ पर्यंत बादल सरकारांच्या अनेक नाटकांचे प्रयोग पुण्या-मुंबईतील रंगमंचावर झाले. सुरवातीला त्यांची नाटके कमानी रंगभूमीवर वावरली.

१९८० ते २००० मधील नाटक समकालीन नाट्यप्रवाहातील नाटकांकडे किंवा नाटककारांकडे पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, या नाटककारांचा पिंड इथॉस कोअर प्रत्येकांमध्ये फारसे साम्य नाही. १९५५ ते १९८० पर्यंतच्या काळांमध्ये तथाकथित प्रायोगिक रंगभूमीवर नावीन्याची जी धडपड दिसत होती ती १९८० नंतर मात्र तितक्या प्रमाणात दिसत नाही. असाच बहुतेक समीक्षकांचा सूर आहे. १९८० पासून २००० पर्यंत नाट्यावकाश संकुचित होत जाताना दिसते. १९८० ते १९९३ या १३ वर्षांतील समांतर धारेतल्या नाटकांचे लक्षणीय वैशिष्ट्य हे 'सर्वमुक्त' आहे. पूर्वग्रहितांवर व पूर्वनिकषांवर उभे न राहता अधिक मोकळे पणाने भूतकाळाला व भविष्यकाळाला ग्रहण करण्याचा प्रयत्न या तेरा वर्षात दिसतो.

१९६० ते २००० पर्यंतच्या कालखंडातील सामाजिक राजकीय कालखंडाचा परिणाम नाटकांवर झाला व त्या त्या प्रकारचे विषय हाताळले. या नाटककारांवर व नाटकांवर काही नाट्य समीक्षकांनी आपले अभिप्राय व्यक्त केलेले दिसून येतील. त्याचबरोबर नाटकाचे स्वरुपही दिसून येईल. नाटकाबरोबर वाड;मयातील दुसरा प्रकार म्हणजे कादंबरी १९५० ते १९७५ या कालखंडातील कादंबरीचे स्वरूप हे कसे होते. या कालखंडातील कादंबरीवर समीक्षकांची मते खालीलप्रमाणे जाणून घेता येतील. १९०० नंतरचे कादंबरीकार म्हणजे श्रीपाद नारायण पेंडसें. १९१३ व्यंकटेश माडगूळकर १९२७, गोपाल नीलकंठ दांडेकर १९१६, उद्धव शेळके १९३१, असे कादंबरीकार या सुमारास उदयाला आले. १९६२ साली या कादंबरीनंतर इतिहासातील व्यक्ती रेखांवर आधारलेल्या कादंबऱ्यांची लाट उसळली. १९६३ ला जयवंत दळवी यांनी 'चक्रद्वार' ही कादंबरी लिहली. मुंबईतील व्यक्तीच्या जीवनाचा वेध घेताना कादंबरीच्या सांकेतिक चौकटीत कोंबण्याचा प्रयत्न केला नाही. मराठी कादंबरीचा विकासाबाबत साकल्याने विचार केला असता असे म्हणावे लागते की, उत्तुंग प्रतिभेच्या कादंबरीचा अभाव अजूनही तीव्रतेने जाणवतो आहे. पण असे असले तरी सध्या अत्यंत संवेदनशील वृत्तीच्या तीव्र बुद्धीमत्तेच्या धीटपणे कोणत्याही अनुभवाचे दर्शन घडवू शकणाऱ्या आणि जागतिक पातळीवरील वाड;मयाच्या क्षेत्रातील विविध प्रवृत्ती-प्रवाहाची जाण असणाऱ्या कादंबरीकारांची संख्या हळूहळू वाढत असल्यामुळे मराठी कादंबरीचे अधिक मोठी आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य वृद्धींगत होत आहे.

१९६० नंतरच्या कादंबरीचे स्वरुप म्हणजे १९६० नंतर साक्षर लोकांची संख्या वाढली. त्यामुळे वाचकवर्ग वाढला १९६० ते ८५ हा पंचवीस वर्षांचा कालखंड समग्र साहित्ये तिहासाच्या दृष्टीने लहान कालखंड आहे. तरीही या कालखंडामध्ये मराठी कादंबरी किती अंगानी फुलली, बहरली तिच्या कोणत्या

मर्यादा स्पष्ट झाल्या आणि भविष्यकाळातील मराठी कादंबरीचे स्वरुप कसे असू शकेल हे पाहता येईल. या कालखंडामध्ये ना. स. इनामदार त्र्यंबकजी डेंगळे, यशवंतराव होळकर, दुसरा बाजीराव, पहिला बाजीराव औरंगजेब या नायकांच्या जीवनावरील ऐतिहासिक कादंबऱ्या लिहल्या. 'श्रीमान योगी' ही श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील कादंबरी आहे. शिवाजी महाराजांना आपले दैवत मानणाऱ्या दांडेकरांनी शिवकालाशी निगडीत ' बया दार उघड', 'हरहर महादेव', 'दर्या भवानी', या कादंबऱ्या लिहिल्या. सामाजिकता हे या कादंबऱ्यांचे विशेष आहेत. इतिहासाप्रमाणेच पुरानकथांचे आकर्षण कादंबरी लेखकांना आल्याचे दिसते. 'स्वामी' च्या आधी प्रसिद्‌ध झालेली ययाती पौराणिक कथानायकाचे चित्रण करणारीच नव्हे तर पुराणकथेतून नवाअर्थ शोधणारी कादंबरी आहे. या पौराणिक व ऐतिहासिक काळातील व्यक्तींना नायकत्व देऊन व्यक्ती केंद्रीत कादंबरी लेखनाची ही प्रथा अर्वाचीन काळातील व्यक्तीपर्यंत येऊन थडकते तेव्हा चरित्रात्मक कादंबरीचा जन्म होतो.

दुर्दम्य, आनंदी गोपाळ, स्वातंत्र्यवीर सावरकर, आचार्य अत्रे, रघुनाथांची बखर, रं. घो. कर्वे, अमृतपुत्र भा. द. खैर १९६० नंतर ऐतिहासिक, पौराणिक कादंबरी लिहिण्याची मोठी लाट आली. नंतर वास्तववादी कादंबरीची लाट जयवंत दळवीची चक्र भालचंद्र नेमाड्यांची कोसला प्रसिद्‌ध झाली. आणि नागर वास्तव कादंबरी टीपणारी कादंबरी व अस्तीत्ववादी कादंबरी या दोन प्रवाहांना सुरुवात झाली. राजकीय कादंबऱ्याही लिहिल्या जाऊ लागल्या. ग्रामीण समस्यांचे चित्रण करणाऱ्या ग्रामीण कादंबऱ्यांचे लेखनही फार मोठ्या प्रमाणांमध्ये होऊ लागले. १९६० नंतर वाढलेली लेखकांची संख्या आणि निर्माण झालेले प्रवाह यामुळे काही लेखकांचा कालखंड आहे असे म्हणता येत नाही. १९६० नंतर वाढलेली लेखकांची संख्या आणि निर्माण झालेला प्रवाह यामुळे काही प्रमुख लेखकांचा उल्लेख करता येईल. चि. त्र्यं. खानविलकर व भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्यांची मराठी समीक्षकांनी दखल घेतलेली आहे.

१९६० नंतर कादंबरी व नाटकाबरोबर कवितेचाही प्रवाह वाहू लागला. काव्याचे स्वरुप कसे होते. काव्याचे विषय कोणते होते आणि ज्या प्रकारे कथेवर समीक्षा झाली. आणि काव्यावर देखील अनेक समीक्षकांनी आपली समीक्षा व्यक्त केली. १९६० नंतरच्या काव्यावरील समीक्षेचे स्वरुप म्हणजे ६ व्या दशकाच्या उत्तरार्धात मराठी कवितेत एक नवे पर्व सुरु झाले. या संक्रमणामध्ये या नविन पिढीच्या कवितेचा आणि समीक्षेचा फार मोठा वाटा आहे. त्या काळांमध्ये या पिढींसमोर प्रामुख्याने मर्ढेकरांनी आधुनिकतावादी कविता मुक्तीबोधांची सामाजिक बांधिलकीची कविता आणि पु. शि. रेगे यांची सौंदर्यवादी रोमँटिक भावकवितेच्या परंपरेचा विशेष होता. पु. शि. रेग्यांच्या चतुस्त्र प्रतिभेमुळे आणि दीर्घकालीन साहित्यिक कारकीर्दीमुळे या परंपरेला एक खास प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. पुढे बा. भ. बोरकर, इंदिरा संत, आरती प्रभू, वसंत बापट, मंगेश पाडगांवकर यांच्या पासूनच मनोहर ग्रेस यांच्या पर्यंतच्या अनेक नावाजलेल्या कवींनी या परंपरेची कास धरल्यामुळे ही परंपरा करंदीकर, सूर्यांचा अपवाद वगळता हळूहळू क्षीण होत गेली. आणि या सौंदर्यवादी रोमँटिक भावकवितेच्या परंपरेचा जवळजवळ एकछत्री अंमल मराठी कवितेत सुरु झाला. मराठी कवितेच्या इतिहासामध्येही कविता महत्वाची ठरली.

'अरुण कोल्हटकर' यांच्या कवितेवरील ही सौंदर्यवादी रोमँटिक भावकवितेच्या परंपरेविरुद्‌ध नोंदविलेली महत्वाची प्रतिक्रिया होती. मर्ढेकरांच्या आधुनिकतावादी कवितेच्या परंपरेचे पुनरुज्जीवन करुन

तिची व्याप्ती वाढवून कोल्हटकरांनी तिला नवी परिमाणे दिली. आधुनिक संस्कृतीतील अमानवीकरणाच्या भयावह प्रक्रियेचे वास्तव चित्रण करून आधुनिक महानगरी माणसाचा आधुनिक माणसाचा पेच आपल्या कवितेत मांडला. सामान्य माणसाच्या रोजच्या व्यवहारातील बोलीशी जवळीक साधणारी भाषा आहे. अशा प्रकारची समीक्षकांची मते अरुण कोल्हटकरांषियीची आहेत.

आधुनिक मराठी कवयित्रींचा कविता या नावाचा एक समीक्षनात्मक ग्रंथ प्रा. रा. ग. जाधव यांनी लिहिलेला प्रतिमा प्रकाशनाने नुकताच प्रकाशित केला. या संग्रहामध्ये त्यांनी आधुनिक मराठी कवयित्रिंच्या कवितेचा चिकित्सक पण धावता आढावा घेऊन गेल्या सुमारे दीड-दशकातील १९८०-१९९५ मानुषी काव्याचा वेध घेतलेला आहे. तो अभ्यासण्यासारखा आहे. १९८० पूर्वीची मराठी कवयित्रिंच्या कविता काही निरिक्षणे काही निष्कर्ष साधारणपणे २० व्या शतकाच्या पहिल्या दशकातच 'स्त्री' काव्याचे संग्रह स्वतंत्र व संपादित अशा स्वरुपामध्ये प्रकाशित होऊ लागल्याचे दिसते.

मराठी समीक्षेच्या इतिहासातील जवळजवळ सर्व कालखंडाचे आपण धावते आलोडन केले. 'विविधज्ञानविस्तारांच्या' कार्यानंतर ज्या प्रमुख अशा मराठी टीकाकारांच्या कार्याचा आपण परीचय करून घेतला त्यावरून या काळातील समीक्षेचा स्थूल परिचय होण्यास निश्चितपणे सहाय्य व्हावे.

साहित्याचे स्वरुप आणि साहित्यप्रयोजन यांचाच अर्वाचीन कालखंडाप्रारंभी विचार झालेला दिसून येतो. त्याचबरोबर पारंपारिक साहित्यशास्त्र आणि पाश्चात्य साहित्यशास्त्र यांचा संगम साधण्याचा प्रयत्नही झालेला दिसून येतो. प्रा. व. दि. कुलकर्णी यांच्या मते वरील तीन दृष्टींनी हरिभाऊ पासून मर्ढेकरांपर्यंत विचार मांडला गेला. त्यानंतरच्या काळात श्री. लालजी पेंडसे यांनी विशिष्ट भौतिक परिस्थितीत विशिष्ट प्रकारच्या विचारसरणी व कलाकृती निर्माण होत असतात. प्रत्येक फरकाला अनुकूल असेच कलेचे स्वरुप बनत असते. असे सूत्र मांडले. श्री. पु. य. देशपांडे यांनी सामाजिक गतिमानता व कलावंताची व्यक्तिनिष्ठता यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. अभिजात वाड;मय व त्याची उदात्तता यांचा पु. य. देशपांडे यांनी अभिक्षेप केल्याने प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनी त्यांस विरोध केला. याच कालखंडामध्ये 'कलेसाठी कला' आणि जीवनासाठी कला या वादांनी साहित्यसमीक्षक दूमदूमून गेले. दोन्हीही पक्षांमध्ये अभिनिवेश होते. तरी पण या कलाजीवनवादाच्या वर्तुळामध्ये आणि प्रयोजनाबाबतच्या दोन्हीही पक्षांच्या कल्पना नि:संदिग्ध नसल्याने ही टीका नि:सत्व ठरली. आपल्याच वर्तुळात ती फिरत राहिली.

या कालखंडामध्ये रा. श्री. जो यांचा अभिनव काव्यप्रकार सौंदर्यशोध व आनंद बोध ह्या टीकात्मक ग्रंथातून तसेच द. के. केळकर, कोल्हटकर, के. ना. वाटवे इत्यादिंनी आपल्या ग्रंथातून विचार मांडले. काव्यानंदाच्या वेगवेगळ्या उपपत्ती याच काळात मांडल्या गेल्या याच काळात प्रा. श्री. के. क्षीरसागरांनी आपले टीकालेखन केले. नियमबद्धतेपेक्षा सर्जनशील टीकेवर त्यांनी भर दिला.

मर्ढेकरांनी आपली समीक्षा तात्विक पायावर उभी केली आणि आपल्या विवेचनास विचारांची जोड दिली. प्रा. रा. भि. जोशी, प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी मर्ढेकरांच्या भूमिकेतील प्रश्नांचा प्रतिवादही केला. असे प्रा. वसंत दावतर म्हणतात. प्रा. दावतरांच्या मते मर्ढेकरांच्या सौंदर्य विवेचनातील तर्क तत्वज्ञानातील विज्ञानपत्की तपासण्याचे कार्य डॉ. सुरेंद्र बारलिंगे. मे. पु. रेगे आणि नरहर कुरुंदकर यांनी केले. मराठी टीकालेखनात अनेक प्रकारच्या लेखनाची भर पडत होती. मर्ढेकरांच्या काही तत्वांस प्रतिवाद निर्माण झाला. काही तत्वांचा विसरही

पडला असे दिसते. दि. के. बेडेकर आणि माधव आचवल या टीकाकारांनी समकालीन विचार, भावना व जीवन यांच्यातून घेतलेल्या अनुभवाची कलात्मक पुनर्रचना साहित्यकृती या सूत्राकडे लक्ष दिले.

प्रा. वसंत दावतरांच्या मते या काळातील साहित्यकृतींची विश्लेषणे करताना तिचे बंध उकलून दाखविताना व मर्म विशद करताना ज्या जीवनांगातून त्या त्या साहित्यकृती जन्मास आलेल्या असतील त्या जीवनांगाचे वास्तव स्वरुप साहित्यकृतीत त्यांचे पडलेले प्रतिबिंब व लेखकाच्या व्यक्तीत्वाने किंवा जीवनदृष्टीने त्यातून पाहिलेले सत्य व भाष्य यांचे विवरण पृथ्थकरण करण्यात मराठी टीका रमलेली आहे. या टीकेत प्रा. रा. भि. जोशी गंगाधर गाडगीळ, वा. ल. कुलकर्णी यांच्या टीकांचा समावेश होतो. असे प्रा. दावतर म्हणतात.

प्रा. अ. के. भागवत यांनी 'मराठी लघुकथा संग्रह' या साहित्य अकादमीने प्रकाशित केलेल्या लघुकथा संग्रहाला लिहिलेली प्रस्तावना हिचाही समावेश या प्रकारच्या टीकालेखनात होतो. असे प्रा. दावतरांचे म्हणणे आहे. प्रा. भागवतांनी 'हरि नारायण आपटे' यांच्या पहिलेच भांडण या कथेपासून ते पडदा या जी. ए. कुलकर्णी यांच्या नवकथेपर्यंतच्या एकोणतीस कथांचा या संपादनात समावेश केलेला आहे. त्यांच्या मते लघुकथा लेखनामध्ये इ. स. १९२६ ते १९४० चा काळ हा संक्रमणाचा आहे. ह्या संक्रमणाच्या वेळी व त्यानंतर लघुकथेने जी वळणे घेतली. त्यांची कारणे भौतिक परिस्थितीत व सामाजिक मूल्यांमध्ये घडून आलेल्या बदलामध्ये, त्यांच्यामुळे वैचारिक व भावनिक भूमिकांमध्ये दिसणाऱ्या स्थीत्यंतरामध्ये आहे असे दिसून येते. असे या लघुकथांच्या वळणाचे नमके स्पष्टीकरण त्यांनी केलेले आहे. त्यानंतर त्यांनी प्रमुख कथाकारांच्या प्रकृतिगत वैशिष्ट्यांचा परामर्श घेतलेला आहे. शेवटी त्यांनी नव्या रसरशीत अनुभवांची नविन संवेदनक्षमतेत नोंद घेणाऱ्या कलावंतांची ही जणू कथा वाट पाहत आहे. ही वाट तिला लवकर दिसेल. अथवा उशीरा पण तिचा मार्ग प्रयोगशीलतेने, बेडर, विश्लेषणाने ठराविक तंत्रमंत्राच्या आणि रूढ नीतिकल्पनांबाहेर जाऊन उजळलेला आहे. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. आजची अस्सल मराठी कथा या त्यांच्या अपेक्षेला उतरते आहे असे म्हणावेसे वाटते. मराठी साहित्याचर्य व ग्रीक नाट्य, मराठी कादंबरीची १०० वर्षे, ललित लेखक व प्रचलित परिस्थिती ललित साहित्यातील उत्कटता इत्यादि लेखातून व उभयान्वयी अव्याया सारख्या अगदी आजच्या काळातील कलाकृतीच्या परीक्षणातूनही त्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. इंग्रजी आणि मराठी साहित्याचे अद्ययावत वाचन प्रदीर्घ चिंतन, स्वतंत्र विचारसरणी ही वैशिष्ट्ये त्यांच्या टीकालेखनाची आहेत.

दि. के. बेडेकर, माधव आचवल, पु. शि. रेगे, दिलीप चित्रे, यांच्या विचारांनी साहित्यसमीक्षा अधिक विस्तृत आणि मूलगामी झालेली दिसते. याच काळांत रससिद्धान्तावरही खूपच चर्चा झाली. पण दि. के. बेडेकर, सुरेंद्र बारलिंगे, आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचेच विचार हे महत्वपूर्ण ठरलेले आहेत.

प्रा. रां. ग. जाधव यांनी देखील 'वाङ;मयीन निबंध' व वाङ;मयीन प्रवृत्ती आणि प्रमेये या टीकाग्रंथातून आपली मते मांडलेली आहेत. वाङ;मयीन निबंध या त्यांच्या लेखनाद्वारे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वाङ;मयीन निबंधाविषयी बहुमोल मार्गदर्शन केलेले आहे. त्यांच्या नववाङ;मयीन प्रवृत्ती व प्रमेये या टीकालेखसंग्रहात विविध विषयांच्या त्यांनी उहापोह केलेला आहे. दलित साहित्य नवकाव्य, नवसमीक्षा या

विषयावर जसे मूलगामी विवेचन त्यांनी केलेले आहे. तसेच चैत्रवन, तुकारामांची कविता श्रीमंत हे स्पंदननाट्य यावरही आपले मौलिक विचार मांडलेले आहेत. काव्यात्म संवेदनशीलता व मानवाच्या जीवनाची कदर या दोन विशेषनांनी त्यांचे टीकालेखन नटलेले आहे. 'साहित्यसंस्कृती' हा त्यांचा समीक्षेवरील आणखी एक मौल्यवान ग्रंथ प्रकाशित होत आहे.

याशिवाय या काळामध्ये गं. त्र्यं. देशपांडे, गो. म. कुलकर्णी, डॉ. द. भि. कुलकर्णी, डॉ. भीमराव कुलकर्णी, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. निर्मालकुमार फडकुले, डॉ. तोरडमल, ल. म. जोग, वसंत दावतर, म. वि. राजाध्यक्ष, विजया राजाध्यक्ष, म. ना. लोही, मोहरीर, श्री. मा. कुलकर्णी, कृ. बा. निकुम्ब, माधव आचवल, मं. पु. रेंगे, रा. भा. पाटणकर, वा. मा. पाठक, दिलीप चित्रे, प्रभाकर पाध्ये, डॉ. सुरेन्द्र बारालिंगे, डॉ. स. ग. मालशे, डॉ. म. वा. ओंड, क. मु. शिंदे, वसंत अबाजी डहाके इत्यादिंच्या विचारांनी मोलाची भर घातलेली आहे. यांच्या विचारांच्या प्रकाशातच मराठी समीक्षा मोठ्या मानाने वाटचाल करीत आहे. 'हेच पुत्र आम्ही हिचे पांग फेडू' हे माधव ज्यूलियनांचे उद्‌गार सिद्‌ध करण्यात ती बऱ्याच प्रमाणात यशस्वी झालेली आहे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर जगातील दूरदूरच्या देशात देखील मराठीची पूजा बांधली जात आहे. तिचे अध्ययन होत आहे. मराठीतील साहित्यविचारातून कलाकृती व तिच्या संदर्भातील इतर मौलिक प्रश्नांची उकल करण्याचे नेमके व नेटके प्रयत्न आज होत आहेत. पाश्चात्य देशांतील समीक्षेच्या क्षेत्रांतील नवनवीन विचार ही समीक्षा आत्मसात करीत आहे.

या समीक्षकांचे कार्य अजोड आहे. वरीलप्रमाणे १० वे शतक ते १९६० पर्यंतच्या समीक्षेचा आढावा घेऊन समीक्षेच्या पूर्वपीठिकेचा संदर्भ लक्षात येईल.

## संदर्भ टीपा


१) डॉ. वामन भार्गव पाठक, टीका आणि टीकाकार, अनमोल प्रकाशन पुणे,१५ मे १९७२, द्वितीय आवृत्ती पृष्ठ क्र. १८८

२) तत्रैव पृष्ठ क्र. १९१

३) तत्रैव पृष्ठ क्र. १९३

४) तत्रैव पृष्ठ क्र. १९५

५) तत्रैव पृष्ठ क्र. १९७

६) तत्रैव पृष्ठ क्र. २०९

७) तत्रैव पृष्ठ क्र. २१०

८) तत्रैव पृष्ठ क्र. २१०

९) तत्रैव पृष्ठ क्र. १७६

१०) प्रा. शिवाजीराव चव्हाण, साहित्यशास्त्र आणि कला, साहित्यमेव प्रकाशन, सातारा १९७५, प्रथम आवृत्ति पृष्ठ क्र. २२२

११) तत्रैव पृष्ठ क्र. २२३

१२) तत्रैव पृष्ठ क्र. २२३

१३) तत्रैव पृष्ठ क्र.

१४) तत्रैव पृष्ठ क्र. २२४

१५) तत्रैव पृष्ठ क्र. २२५

१६) तत्रैव पृष्ठ क्र. २२५

१७) तत्रैव पृष्ठ क्र. २२६

१८) तत्रैव पृष्ठ क्र. २२६

१९) तत्रैव पृष्ठ क्र. २३५

२०) तत्रैव पृष्ठ क्र. २३६

२१) तत्रैव पृष्ठ क्र. २३८

२२) तत्रैव पृष्ठ क्र. २४०

२३) तत्रैव पृष्ठ क्र. २४३

२४) तत्रैव पृष्ठ क्र. २४३

२५) तत्रैव पृष्ठ क्र. २४५

२६) तत्रैव पृष्ठ क्र. २४७

२७) तत्रैव पृष्ठ क्र. २४७

२८) तत्रैव पृष्ठ क्र. २५२

२९) तत्रैव पृष्ठ क्र. २७६

३०) तत्रैव पृष्ठ क्र. २८२

३१) तत्रैव पृष्ठ क्र. २८३